# ज्योती


## दिवाळी अंक

## २०२४



दीपावल्याः सहस्त्रदीपाः भवतः
जीवनं सुखेन, संतोषेण, शांत्या
आरोग्येण च प्रकाशयन्तू ।

ईशान्य ओहायो मराठी मंडळ
Marathi Mandal of North East Ohio


|| तमसो मा ज्योतीर्गमय ||
HAPPY
Diwali
FESTIVAL OF LIGHTS
From Sathe Family

# लेखानुक्रम


**संपादकीय**
अपूर्वा चिटणीस

**अध्यक्षीय**
उत्कर्ष हजरनीस

**२०२४ सांस्कृतिक कार्यक्रम अहवाल**
केतकी अलूरकर

**आम्ही आणि आमची मुले**
प्रा. शा. म. गवळी

**कृष्णवाणी**
जय मसुरेकर

**लाभले आम्हांस भाग्य**
सौ. कांचन गोडबोले

**बाप**
शिरीष कणेकर

**सुभाषिते-३**
श्रीकांत लिमये

**माझ्या सुनेची सासू**
मीना दीक्षित

**नानकटांची कटकट**
स्वप्नील पगारे

**कणकेचा उपमा**
सौ. रेखा दीपक चक्करवार

**NEOMM आयोजित उन्हाळी शिबिर**
अभिजीत कुलकर्णी

**BMM अध्यक्षीय प्रवास**
संदीप दीक्षित

**अभिजात मराठी भाषेचा गाळीव इतिहास**
जय मसुरेकर

**भगीरथ प्रयत्न**
श्रीकांत लिमये

**बेसन झुणका**
रेखा चक्करवार

**ईशान्य ओहायो मराठी मंडळ सुवर्णमहोत्सव आणि मित्रमेळावा**

**महाराष्ट्रीयन मसालेभात**
राधिका पांडे

**पेणचे मंत्रमुग्ध दिवस: माझं घर, माझी आजी**
विदुला वच्छराजानी

**झटपट पुलाव**
तन्मयी दीक्षित

**२०२४ वार्षिक जमाखर्च**
राधिका पांडे

# संपादकीय

प्रिय वाचकहो,

दिवाळी.....अंधारावर प्रकाशाचा विजय मिळवणारा भव्य दीपोत्सव. अशा ४-५ दिवस चालणाऱ्या भव्य दिव्य सणाची आपण सर्वजण आतुरतेने वाट पहात असतो. लहानपणीच्या दिवाळी आठवणी मनाच्या कोपऱ्यात ताज्या असल्यामुळेही कदाचित ह्या सणाबद्दल आपल्याला विशेष आत्मियता असेल, कुणास ठाऊक!

या उत्सवाची पूर्वतयारी सुरु होते ती घरच्या साफसफाईने. मग कपडे, वस्तू खरेदी. दिवाळी उंबरठ्यावर येऊन ठेपली की घराघरातून फराळांचे वास येऊ लागतात, दारात रांगोळ्या सजतात तर आकाश कंदील टांगले जातात. नरक चतुर्दशीला सूर्योदयाच्या आधी होणारी आंघोळ नंतर सर्वांनी एकत्र बसून केलेला फराळ. "जरा बत्ता मिळेल का चकली तोडायला" अशी खट्याळपणे केलेली विचारणा अशा आणि कितीतरी आठवणी!

आपण सर्वजण आपला देश सोडून काहीतरी मिळवायच्या ध्येयाने अमेरिकेमध्ये आलो. भारतासारखी भव्य दिव्य नाही पण सर्वजण दिवाळी नक्की साजरी करतो. स्थल, काल ह्याप्रमाणे ती साजरी करायचे स्वरूप पालटले आहे इतकेच. दिवाळीत गोड तिखट फराळ करतो तसेच आपल्या NE-OMM परिवाराबरोबर गोड वागून, फराळाप्रमाणे खुमासदार संबध जोडून, रांगोळी, कंदील यांच्या नक्षी आणि रंगसंगतीप्रमाणे आयुष्यही रंगीबेरंगी आणि नक्षीदार करुयात. सौहार्दाची ज्योत लावून स्वतःबरोबर आपल्या मित्रपरिवारांचे आयुष्य उजळून टाकूया. तेंव्हाच सार्थक होईल दीपावली अर्थात......दीप आवली!

संपादक म्हणून माझा हा शेवटचा अंक. जेव्हा ही जबाबदारी मी घेतली तेंव्हा मनावर एक दडपण तसेच भीती होती. संपादक म्हणून माझा पहिलाच अनुभव. पण क्लिवलँडमधील मराठी साहित्यिकांमुळे संपादकीय प्रवास सुखकर झाला. त्यांनी तीन्हीं अंकांसाठी साहित्य उपलब्ध करुन दिले त्यासाठी मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानते. मीना दिक्षित- आपल्या सर्वांच्या मीना मावशी सध्या भारतात आहेत. तरीसुद्धा "अपूर्वा, तू मासिक काढत आहेस मग मी कसा लेख नाही पाठवणार" म्हणून आपल्या पारिवारिक गडबडीमधून त्यांनी मला लेख लिहून पाठवला. आपल्या सर्वांकडून जे प्रेम आणि आशीर्वाद मिळाले त्यासाठी खूप धन्यवाद. तसेच पहिल्या दोन अंकांसाठी digital platform उपलब्ध करुन दिला ते हर्षद कुलकर्णी आणि तिसऱ्या अंकाची स्वतःच्या खांद्यावर जबाबदारी घेतलेले माझे better-half उमेश चिटणीस ह्यांच्याशिवाय मला हे शक्य नव्हते.

दिवाळीच्या सर्वांना अनेक शुभेच्छा. शुभं भंवतू |

सौ. अपूर्वा चिटणीस


### विशेष आभार

**दिवाळी सजावट छायाचित्रे** – अश्विनी दर्यापूरकर, भागयश्री वराडे, अपूर्वा चिटणीस

**अंक सजावट व अक्षर जुळवणी** – उमेश चिटणीस

**मुद्रण सहाय्य** - उत्कर्ष हजरनीस


---

मासिकतील लेखात व्यक्त झालेल्या विचारांशी संपादक आणि संपादकीय समिति सहमत असतीलच असे नाही.

# अध्यक्षीय



नमस्कार,

सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

२०२४ ह्या वर्षी माझी NEOMM च्या अध्यक्षपदी निवड केल्याबद्दल तुम्हा सर्वांचे आभार. ही जबाबदारी देऊन, तुम्ही माझ्यावर जो विश्वास दाखवला, त्याबद्दल मी ऋणी आहे.

मला सांगताना अत्यंत आनंद होत आहे कि ह्या वर्षी आपल्या मंडळाच्या सभासत्वांनी उच्चांक गाठला - ८८ वार्षिक सदस्य आणि ३ नवीन लाईफ मेंबर्स. इतकेच नाही तर आपण आपल्या सदस्यांसाठी विविध इंडियन ग्रोसरी स्टोअर्स आणि रेस्टॉरंट्स कडून डिस्कॉउंट्स मिळवून घेतले. हा टप्पा नक्कीच आपल्या दिवसेंदिवस वाढणाऱ्या समुदायाची ताकद आणि मंडळाप्रती असलेली आपली निष्ठा प्रतिबिंबित करतो.

या वर्षात मागे बघताना, माझ्या समितीने आयोजित केलेल्या सर्व कार्यक्रमांचा मला अभिमान वाटतो. सगळ्या कार्यक्रमांचा अहवाल आपल्याला सांस्कृतिक अहवालातून मिळेलच, पण ह्या वर्षातील काही नवीन उपक्रम मी इथे नेमू इच्छितो.

- आपण पहिल्यांदाच क्लीव्लँड मध्ये मराठी स्टॅन्ड अप कॉमेडी शो आयोजित केला

- गुढी पाडव्याला पंगत जेवणाचे आयोजन केले

- मंडळातील मुलांसाठी समर कॅम्प घेण्यात आला व गणपती आरती/ अथर्वशीर्षाचे पठण करून घेण्यात आले

- नाटकाचा नवीन प्रकार - म्हणजेच नथुराम गोडसे हे ऐतिहासिक नाटक आपल्या सर्वांसाठी आणले

- गणेशोत्सवात विसर्जनाची पहिल्यांदाच वाजत गाजत मिरवणूक देखील काढली

- मे महिन्यातील आपल्या जत्रेच्या कार्यक्रमाला क्लीव्हलँड/अक्रॉन भागातील 350 हून अधिक अतिथी व सोलन चे मेयर एडवर्ड क्रॉस ह्यांनी हजेरी लावली होती. स्थानिक/लहान व्यवसायान बरोबरच आपल्या मंडळातील अनेक छोट्या बालगोपाल उद्योजकांनी देखील त्यांची उद्योजकीय कौशल्ये दाखवली, आणि विशेष म्हणजे या जत्रेत कोलंबस मधील विक्रेत्यांनी सुद्धा सहभाग घेतला होता.

पुढील वर्षी, आपण आपल्या ५० व्या वर्षात पदार्पण करत आहोत. हा टप्पा आपल्या मंडळासाठी एक विशेष क्षण आणि अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. मला सांगताना अत्यंत आनंद होत आहे कि आपल्या सुवर्णमहोत्सवानिमित्त बृहन महाराष्ट्र मंडळ (BMM) मैत्री मेळाव्याच्या यजमानपदाचा मान आपल्याला मिळाला आहे. आजू बाजूचे अनेक मराठी मंडळ ह्यात आपल्याबरोबर सहभागी होणार आहेत. आपण या प्रसंगी तयारी करत असताना, मी तुम्हा प्रत्येकाला तुमच्या कल्पना, सूचना आणि योगदान देण्यास विनंती करतो - कारण हा उत्सव आपल्या सर्वांचा आहे.

शेवटी मी आपल्या उदार देणगीदार आणि प्रायोजकांचे मनापासून आभार मानू इच्छितो. तसेच मी आपल्या मंडळाचे स्वयंसेवक, आपले विश्वस्त, शाळेचे शिक्षक, ढोल-ताशा-लेझीम पथक, आणि आताच्या व मागील सर्व कार्यकारी समितीच्या सदस्यांचे आभार मानू इच्छितो. तुमच्या कठोर परिश्रमामुळेच आपले सर्व कार्यक्रम सुरळीतपणे पार पडत आले आहेत.

धन्यवाद!!

- उत्कर्ष हजरनीस अध्यक्ष, NEOMM २०२४



# 2024 कार्यकारिणी आणि विश्वस्त




डावीकडून उजवीकडे: (मागे) अमृत पत्की, दीपक भट, मेधा गोडबोले, स्नेहा दातार, अपूर्वा चिटणीस, राधिका पांडे, केतकी अलूरकर, उत्कर्ष हजरनीस, यश पोतदार, मनीष राय, सुयोग बापट, योगेश शेजल

पुढच्या रांगेत: पल्लवी चव्हाण, मीनल शर्मा, दीप्ती गणोरे, तन्मयी दीक्षित, प्रेरणा वर्मा, अभिजीत कुलकर्णी, कुणाल बावीसकर, आदित्य घाटपांडे

छायाचित्रात नसलेले: कार्यकर्ते – हर्षद कुलकर्णी, विराज मोरणकर, आनंद मोरे, आरती पगारे, पायल मोकल



















# NEOMM
# पाऊल पडते पुढे

# 2024 सांस्कृतिक कार्यक्रम अहवाल

- केतकी अलूरकर

२०२४ समितीची सचिव म्हणून ह्या वर्षभरात आयोजित केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा आढावा मी इथे आपल्या समोर सादर करत आहे.

ह्या वर्षी एकूणच वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची रेलचेल होती आणि आपण सर्वांनी आम्हाला आणि विविध कलाकारांना मोठ्या संख्येने सहभागी होऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला त्याबद्दल मनःपूर्वक आभार!

**मकर संक्रांत-**

ह्या वर्षीची सुरुवात अर्थातच पहिला सण म्हणजे मकर संक्रांतीने झाली. सर्व महिलांना अत्तर लावून हळदीकुंकू, वाण देण्यात आले. लहान मुलांचे बोरन्हाण, पतंग कार्यशाळा, विविध प्रकारचे खेळ हे ह्या वर्षाचे वैशिष्ट्य होते. चमक धमक, झिप फ्रूट, पेहनावा आणि गुलाबी गोटा या आपल्या प्रायोजकांनी विजेत्यांसाठी खूप आकर्षक बक्षिसे दिली त्याबद्दल त्यांचे आभार.

कार्यक्रमात सर्वांनी गुळपोळीसह स्वादिष्ट जेवणाचा आस्वाद घेतला. नवीन समितीने सर्वांचे स्वागत केले आणि वर्षभराचा आराखडा सादर केला.

१४ जानेवारीला हायलंड हाईट्स सेंटर मध्ये हा कार्यक्रम आयोजित केला



होता. हा कार्यक्रम यशस्वीरित्या साजरा करण्यासाठी सांस्कृतिक समितीने विशेष मेहनत घेतली.

**विविध सिनेमे-**

ह्या वर्षभरात श्रीदेवी प्रसन्न, आईच्या गावात मराठीत बोल, अलीबाबा आणि चाळीशीतले चोर, स्वरगंधर्व सुधीर फडके, आणि नाच गं घुमा इतके सारे मराठी चित्रपट पहाण्याची संधी चित्रपट रसिकांना मिळाली. हे चित्रपट मराठी मंडळाने प्रायोजकांसमवेत आणले.

**होळी आणि स्टँडअप कॉमेडी -**

२२ मार्च रोजी होळीनिमित्त क्लीव्हलंड मध्ये पहिल्यांदाच मराठी स्टँडअप कॉमेडी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. "शुभमंगल सावधान" या मंदार भिडे यांच्या कॉमेडीने सर्वांच्या आवडत्या "लग्न" या विषयावर अत्यंत विनोदी पद्धतीने नॉर्डोनिया हायस्कूल मध्ये उपस्थित प्रेक्षकांची धमाल करमणूक केली. अगदी १३/१४ वर्षांच्या मुलांपासून ८० वर्षांच्या आजीपर्यंत मंदारने २ तास सर्वांना पोट दुखेपर्यंत हसवले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व प्रेक्षकांना रंगांचा तिलक लावून मग स्वादिष्ट न्याहारी देण्यात आली.

**गुढीपाडवा आणि "वीर सेनानी"-**

२० एप्रिलला गुढी पाडव्यानिमित्त एक अत्यंत अनोखा सोहळा पार पडला. तो म्हणजे पंगत जेवण. गुढी उभारून पूजा पार पडल्यानंतर सर्व उपस्थितांना केळीच्या पानावर अस्सल मराठी पदार्थ आग्रहाने वाढून फारच सुखद अनुभव मंडळाने दिला. वांगं, तोंडली या भाज्या, मटकीची उसळ, भजी, अळूवडी, बासुंदी पुरी, आमटी भात आणि तोंडी लावण्यासाठी पापड, लोणचे, चटणी आणि यासोबत आग्रहाने वाढणारे मंडळाचे स्वयंसेवक. अगदी भारतात लग्नात जेवत असल्यासारखे वाटले असे खूप लोकांनी आवर्जून सांगितले.

या सुग्रास जेवणाबरोबरच डेट्रॉईटच्या सायली व सागर वैद्य यांनी लिखाण, दिग्दर्शन, संगीतबद्ध केलेल्या "वीर सेनानी" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या सेनानींबद्दलची माहिती नवीन पिढीला समजावी आणि जुन्या पिढीला पुन्हा एकदा स्मरण करून द्यावे हा या कार्यक्रमाचा हेतू होता आणि हा दृकश्राव्य कार्यक्रम सर्व रसिकांना खूप आवडला.

**महाराष्ट्र जत्रा -**

११ मे रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त महाराष्ट्र जत्रेचे आयोजन सोलन मिडल स्कूलच्या जिम मध्ये करण्यात आले. यावेळी विविध मराठमोळ्या खाद्यपदार्थांचे, पारंपारिक साड्या, ड्रेस, दागिने यांचे स्टॉल्स उभारण्यात आले होते. प्रचंड संख्येने उपस्थित राहून मराठीच नव्हे तर इतर भाषिक भारतीय लोकांनी या संधीचा लाभ घेतला. मुलांच्या करमणूकीसाठी वेगवेगळे खेळ, रॅफल, कॅरिओकी यांचे आयोजन केले होते.

"नथुराम गोडसे"

२६ जुलै रोजी नथुराम गोडसे या शरद पोंक्षेंची प्रमुख भूमिका असलेल्या दोनपात्री नाटकाचे आयोजन करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय प्रवासातील

अडचणी, काही कलाकार ठरल्या दिवशी येऊ न शकणे अशा अनेक व्यत्यय या कार्यक्रमात आले. पण मुख्य कलाकार श्री. पोंक्षे स्वतः वेळेवर पोहोचले आणि त्यांनी ठरल्या वेळी रसिकांचा हिरमोड होऊ नये म्हणून नथुराम गोडसेंवर व्याख्यान दिले तसेच परत एकदा सगळ्या कलाकारांना घेऊन नाटकाचा प्रयोग करण्याची तयारी दाखवली.

व्याख्यानादिवशी न्याहारी बॉक्स उपलब्ध केले होतेच आणि प्रेक्षकांना गरमागरम भजी, चहा यांचाही आनंद घेता आला.

सर्वात महत्त्वाचं म्हणजे ८ ऑगस्टला दुसरे प्रेक्षागृह उपलब्ध झाले आणि नाटकाच्या संपूर्ण टीमने दोन शहरांच्या प्रयोगांमध्ये परत क्लीवलंडला येऊन नाटकाचा प्रयोग केला आणि सर्व रसिकप्रेक्षकांचे मन जिंकून घेतले. हॅट्स ऑफ टू शरद पोंक्षेजी.






**गणपती उत्सव -**

आपल्या मनावर अधिराज्य करणारी देवता म्हणजे बुद्धी देवता, विघ्नहर्ता गणपती बाप्पाचा गणेशोत्सव. १५ सप्टेंबर २०२४ ला इंडिपेन्डन्स मिडल स्कूल मध्ये लेझीम आणि ढोल ताशांच्या गजरात गणपती बाप्पांचे आगमन झाले. गणेशाची पूजा, विविध वयोगटातील सर्वांनी एकत्र म्हणलेले अथर्वशीर्ष आणि आरती या बरोबर गणपती बाप्पा विराजमान झाले.

उकडीचे मोदक, आणि इतर मराठमोळे जेवण हे या सणाचे वैशिष्ट्य होते. गरम मोदक त्यावर तुपाची धार, चविष्ट भाज्या यांचा आस्वाद सर्वांनी घेतलाच आणि त्यानंतर "बाबूजी आणि मी" या श्री श्रीधर फडके प्रस्तुत आपले लाडके बाबूजी म्हणजेच सुप्रसिद्ध गायक संगीतकार श्री सुधीर फडके आणि त्यांचे सुपुत्र श्रीधरजी यांच्या गाण्यांचा देखील आनंद लुटला. अत्यंत सुरेल अशा या कार्यक्रमात श्रीधरजींना सौ. दीपिका जोग दातार यांनी साथ दिली. विशेष म्हणजे कोरस साठी आपल्या मराठी मंडळातीलच प्रांजली देशपांडे, नेहा शेलार, विदुला वाच्छाराजानी, कांचन गोडबोले, अमिता बापट, अक्षदा ठाकूर, निलेश कुलकर्णी, सुनिल खाडिलकर आणि श्रीवल्लभ रामदुर्ग यांना गाण्याची आणि उमेश चिटणीस व केतकी अलुरकर यांना सूत्रसंचालनाची संधी मिळाली.

यानिमित्त ३ सप्टेंबर रोजी गणेशमूर्ती घडवण्याची कार्यशाळा सर्व वयोगटातील लोकांसाठी आयोजित करण्यात आली. सजावटीसाठी देखील अनेक कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला आणि सुंदर आरास तयार केली.

कार्यक्रमाच्या शेवटी परत एकदा लेझीम, ढोल ताशे वाजवून, सर्वांनी विसर्जन मिरवणुकीत सहभागी होऊन गणपती बाप्पाला निरोप दिला.

**मंदिर महाप्रसाद -**

२७ ऑक्टोबरला श्री शिवा विष्णू मंदिरात मराठी मंडळातर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. समिती, सभासद आणि स्वयंसेवकांनी मिळून मंदिराच्या स्वयंपाकघरात २००-२५० लोकांसाठी महाप्रसाद तयार केला. पुऱ्या, मिश्रभाजी, बटाटा रस्सा, फोडणीचे वरण आणि भात, पापड, लोणचे आणि श्रीखंड/आम्रखंड इत्यादी पदार्थ मोठ्या प्रमाणात आणि चविष्ट बनवण्यासाठी सर्वांनी खूप मेहनत घेतली. भाज्या चिरण्यापासून, सर्वांना वाढण्यापर्यंत स्वयंसेवक तत्परतेने हजर होते. घरगुती २/४ लोकांसाठी स्वयंपाक करण्याची सवय असताना २००/२५० लोकांचा स्वयंपाक हसतखेळत विनासायास बनतो आणि सर्वांना प्रसाद मिळतो ही त्या श्रींचीच योजना!

**दिवाळी २०२४**

१७ नोव्हेंबर या दिवशी २०२४ चा शेवटचा कार्यक्रम दिवाळी साजरी करण्यात येणार आहे. लोटस बँक्वेट हॉलमधे हा कार्यक्रम संपन्न होईल. यावेळी २०२५ च्या समितीसाठी निवडणूक, दिवाळी फराळ आणि सुग्रास जेवण यांचे आयोजन करण्यात आले आहे.

वर्षभरात तुम्ही वारंवार दिलेली कौतुकाची पावती ही आमच्यासाठी अजून चांगले काम करण्यासाठी प्रेरणादायी ठरली. सर्वांचे पुन्हा एकदा मनःपूर्वक आभार!





# आम्ही आणि आमची मुले

- प्रा. शा. म. गवळी

"अतिथी देवो भवं" या उक्तीनुसार मला अमेरिकेत येऊन एका चिंतनशील विषयावर लिहिण्याची आणि उभ्या आयुष्यातील अनुभव मांडण्याची सुवर्णसंधी अमेरिकेतील महाराष्ट्र सांस्कृतिक मराठी मंडळ आणि त्यांचे संचालकांनी दिली या दुग्ध शर्करा योगाबद्दल मी अत्यंत आनंदी आहे व ऋणी आहे. माणूस समाजशील व समुहप्रिय प्राणी आहे. इतर प्राण्यांपेक्षा त्याला परमेश्वराने भाषेची देणगी दिली आहे. त्यामुळे तो आपल्या भावना, प्रेम, सुख-दु:ख एकमेकांशी व्यक्त करू शकतो. त्याच उद्देशाने मी सादर लेखात "आम्ही आणि आमची लेकरे" या विषयावर लेखन करीत आहे.

आपले आयुष्य तीन अंकी नाटकच आहे. ते म्हणजे बालपण, तारुण्य आणि वृद्धत्व. बालपण अतिशय रम्य असते ते नकळत खेळण्या-बागडण्यात निघून जाते. त्यानंतर येते तारुण्य ते जबाबदाऱ्या, अपेक्षा, चिंता, काळजी, कर्तव्य, सुख:दुःख, आशा-निराशा, जय-पराजय, स्वप्ने अशी अनंत ओझी वाहण्यात जाते तर वृद्धत्व म्हणजे परावलंबत्व, परमार्थ, परस्वामीत्व. यालाच आपण  स्वप्ने जीवन असे गोंडस नाव देतो.

तारुण्य हा आपल्या जीवनाचा महत्वपुर्ण काळ असतो. या काळात आपणास सुखद स्वप्ने पडतात तेवढीच स्वत्वाची आणि जबाबदारीची जाणीव होते. तारुण्यात शिक्षण आणि अर्थार्जनाने आपण स्वावलंबी बनतो. हा सुखद काळ संपतो न संपतो तोच आपण विवाहबद्ध होतो आणि आपण वेगळ्याच कुटुंब विश्वात प्रवेशीत होतो. जीवनातला हा सर्वात आनंदी कालावधी असतो. आपण याच काळात सुखद स्वप्ने पाहू लागतो. त्यातच आपले एक सुंदर घर असावे.. एक चांगली गाडी असावी.. गोंडस मुले असावीत. ती सुंदर, हुषार, बुद्धिमान असावीत अशी स्वप्ने पाहण्यात रंगून जातो.. पण त्याच वेळेला आपणास अनंत गरजा, जबाबदाऱ्या, आणि कर्तव्य, चिंता, काळजी यांना जन्म देतो आणि त्यांची यथायोग्य सांगड घालायला शिकतो.

आता आपण आप्पा ऐवजी पप्पा आणि ताई ऐवजी आई बनते. या आयुष्याच्या दुसऱ्या टप्प्यात आपण लेकरांसाठी मोठी स्वप्ने रंगवतो. त्यासाठी वेळ, कष्ट, पैसा यांची सांगड घालतो. वेळप्रसंगी खर्चाला कात्री लावतो तर ऐषारामाला तिलांजली देतो. आई घराचा आत्मा बनते. स्वतः चे सुख-दु:ख लपवते. घराचे घरपण जपण्यासाठी अनेक गोष्टींचा त्याग करते.  तर बाप घराचं कणा बनतो. राब राब राबतो आणि जेही आण म्हटले कि आणतो आणि आधारस्तंभ बनतो.

(माय) आई आणि बाप दोघेही उभ्या आयुष्यात कमावलेली संस्कारांची शिदोरी, धन, संपत्ती, पैसा-अडका, स्थावर, अनुभव-अनुभूती लेकरांकडे निसंकोचपणे, निस्वार्थीपणे सोपवतात. त्यांना जीवनातले चढ-उतार, सुख-दु:ख, नफा-तोटा, नाती-गोती, माय-बाप, सखा-परका, भाऊ-बहिण , पाप-पुण्य, प्रेम-विरह या व अशा संस्काराच्या अनंत गोष्टी शिकवतात. म्हणूनच म्हणतात - "शंभर शिक्षकांपेक्षा एक आई श्रेष्ठ असते". बाप म्हणजे आयुष्याला आकार देणारा शिल्पकार असतो.


आई आणि वडिलांना आपल्या लेकरांना कुंभार जसा माती चिखलाच्या गोळ्याला आकार देऊन मातीची सुंदर भांडी बनवितो तसे सुंदर संस्कार देऊन घडवतात, मोठी करतात परंतु आजच्या प्रगत वैज्ञानिक युगात मुलांच्या हाती मोबाईल व टेलिव्हिजन सारखी शैक्षणिक साधने लागली आहेत. मोबाईलमुळे जगातील कोणतीही, कोणत्याही प्रकारची सखोल माहिती शून्य मिनिटात मिळते परंतु त्याचे सवयीत रूपांतर होवुन  अनेक मुला-मुलींना व्यसन लागले आहे. त्यामुळे मुला-मुलींचे भवितव्य अंधारमय झाले आहे. आजच्या युगात भौतिक गरजा प्रचंड प्रमाणात वाढवून घेतल्याने प्रत्येकाला त्या पूर्ण करण्यासाठी नोकरी किंवा व्यवसाय करावा लागतो आणि अर्थार्जन करावे लागते त्यातच घरातील आई-वडील दोघे नोकरी-व्यवसाय करीत असतील तर त्यांच्याकडे आपल्या लेकरांचे आरोग्य आणि शिक्षणाकडे लक्ष्य देण्यासाठी वेळ पुरात नाही. त्यामुळे मुले मोबाईलचे, टीव्ही, व्हिडिओ गेमचे बळी पडतात आणि त्यामुळे त्यांची शैक्षणिक प्रगती खुंटते.

मला आपणास सावध करावेसे वाटते. मुलांच्या विकास आणि पालकांच्या स्वप्नांचा अक्षरश: चुराडा करणारा मोबाईल राक्षस आहे. मोबाईल मुलांच्या आयुष्याशी खेळणारा शत्रू आहे. मोबाईल मुलांना सवयीचा गुलाम बनवतो आहे. मोबाईल मुलांच्या हाती पडताच त्यांना वेळेचे भान राहत नाही. सर्वप्रथम सतत मोबाईल पाहिल्याने त्यातील रेडिएशनमुळे मुलांची दृष्टी क्षीण होते.

चष्मा लागतो. एवढेच काय मुले जास्त प्रमाणात इअरफोन वापरतात त्यामुळे कानांनाही इजा होवू शकते. सतत हाताची बोटे स्क्रीनवर फिरवत तासन तास वेळ घालवतात त्यामुळे लिहिण्याची सवय मोडत जाते तर एकाच ठिकाणी दीर्घकाळ बसल्याने पायांना चालण्याची, पाळण्याची सवय राहत नाही त्यामुळे बालवयातच आरोग्याचा समस्या निर्माण होवू शकतात.

मोबाईलच्या व्यसनाने मुलांच्या मेंदूवर परिणाम होतो ते आळशी व चिडचिडे बनतात. सतत बसून राहिल्याने त्यांच्या शरीराला व्यायाम मिळत नाही व त्यांची पचनक्रिया मंदावते आणि शरीर स्थूल बनते, लठ्ठ बनते. त्यांची अभ्यासाची प्रवृत्ती नष्ट होते. तासान तास मोबाईल पाहिल्याने, सोशल मीडिया वर वेळ घालवल्याने त्यांना वाचनाची आवड राहत नाही आणि मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. वैज्ञानिक संशोधनातूनही आता सिद्ध झाले आहे कि सोशल मीडियाच्या अती वापरामुळे अनेक किशोरवयीन मुले आज तणाव आणि डिप्रेशनचा सामना करीत आहेत.

कधी कधी आपले मुलांवरील अतिप्रेमामुळे किंवा लाडामुळेही मुले लाडावतात आणि आपणाशी तसेच इतरांशी तटस्थ वागतात त्यामुळे मुलांची शिस्त बिघडते आणि मुले बेशिस्त बनतात म्हणून मुलांशी बोला, संवाद करा, प्रेरक कथा, गोष्टी, गाणी, पोवाडे, नाटके ऐकवा. त्यांना प्रेम व शिष्टाचार शिकवा हि विनंती. आई-वडील मुलांवर विश्वास टाकतात. आपला बहुमोल वेळ, पैसा आणि श्रम त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी लावतात परंतु वेळेवर जागृत न राहिल्याने शेवटी पश्चातापाची वेळ येते आणि उभ्या आयुष्याची तपश्चर्या वाया जाते म्हणून मला आपणास नम्र विनंती आणि सूचना करावीशी वाटते की आपल्या मुलांवर फक्त आणि फक्त ९९ टक्के विश्वास ठेवा मात्र १ टक्का अविश्वास असू द्या. आपण आपल्या मुलांची काळजी घ्या कारण त्यांना या वयात दिलेले संस्कारांचे बाळकडू तुमच्या म्हातारपणी कामी येईल कारण मुले हीच म्हातारपणाची काठी असते.




# कृष्णवाणी

- जय मसुरेकर



सिद्ध हो वीरोत्तमा
रण समीप येऊ घातले
समर्थ तू निर्दालना
हे षड्रिपू जे मातले

ज्ञानगांडिवा तुझ्या
ब्रम्हास्त्रबुद्धी जोड तू
सोडुनी शर जाड्यावरी
आलस्यवध कर पूर्ण तू

थैमान मोहासुर करी
दावूनी लक्ष प्रलोभने
कर्तव्यखड्ग उभारुनी
कर वासना निर्दालने

शूलाग्रे तळपती पहा
मननिग्रह अन् संस्कृती
वधी छेडूनी गंडस्थळे
तू काम क्रोध व विकृती

गुरुआशीषाचे कवच तुज
अन् स्वजनप्रिती कुंडले
उठ त्यागुनी दौर्बल्यअश्वा
स्वारी जयरथ मंडले




# लाभले आम्हांस भाग्य

- सौ. कांचन गोडबोले

'लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी', हे गाणे ऐकले कि मराठी भाषेचा सार्थ अभिमान जागृत होतो. आपली मराठी भाषा, परंपरा, आपली संतमंडळी, कवी, लेखक, गीते आणि मराठी गाणी आणि ह्या सगळ्यामुळे आपली भाषा समृद्ध होत गेली. अशी हि सुमधुर गाणी आणि त्यांना संगीतबद्ध करणारे महान संगीतकार आठवतात. त्यातील दोन महत्वाची आणि सुप्रसिद्ध नवे म्हणजे श्री. सुधीर फडके आणि श्री. श्रीधर फडके, ह्यांची गाणी आपण सगळे ऐकत आलो आहोत आणि अजूनही ती अजरामर राहतील.

ह्या दोघांच्या गाण्यांचा संगम असलेल्या ' बाबूजी आणि मी' ह्या अमेरिकेमधील श्रीधरजींच्या कार्यक्रमासाठी, मी, माझ्या एका गाण्याचा 'ऑडिओ' आमच्या मराठी मंडळाचे प्रेसिडेंट श्री. उत्कर्ष ह्यांना ऑगस्ट महिन्यात पाठवला होता. जवजवळ १० ते १२ दिवसांनी श्रीधरजीनी "ह्या काही सभासदांची निवड केली आहे, तेव्हा हा ग्रुप जॉईन करावा" असा reply आला. ६ female आणि ३ male असे आम्ही select झालो होतो. मी सर्वांची नावे बघितली तेव्हा, आम्ही कोणीच कोणाला ओळखत नव्हतो असे कळले. तसेच गणपती उत्सवासाठी साजरा होणाऱ्या ह्या कार्यक्रमाच्या तारखेपर्यंत श्रीधरजी, मार्गदर्शनासाठी, प्रत्यक्ष किंवा ऑनलाईन असे भेटणार नव्हते.

तेव्हा दुसऱ्या दिवशी ह्या कार्यक्रमाचे संयोजक आसावरी ताई ह्यांच्याकडून गाण्याची एक list मिळाली. त्यात ७- ते ८ गाणी होती. सुरुवातीला chorus गाणे, हे सोपं वाटलं होतं, पण एकत्र जमल्याशिवाय ते शक्य होणार नव्हतं.

तेव्हा सौ. अक्षदा हिने पुढाकार आणि संयोजिकां बरोबर coordination अशी जबाबदारी घेतली. आणि आम्हा सगळयांना तिच्या घरी एकत्र जमण्यास सांगितलं. ओळख परेड झाली. आम्हाला सगळयांनाच खूप आनंद झाला होता. खरतर आम्हाला एकही solo गाणं म्हणायचं नव्हतं, पण तरीही आनंदाबरोबर एक जबाबदारी होती.

आम्ही एक एक करून सगळी गाणी नीट ऐकली. प्रत्येक गाण्याची चाल, पट्टी, chorus मधील काही आलाप, त्यातील बारकावे, सुरांमधील उतार चढाव, तसेच शब्दांमधील अस्खलितपणा, अचूकता ह्या सगळ्याचे निरीक्षण आम्ही केले. विचारविनिमय केला. श्रीधरजी किंवा गायिकेचे कडवे संपले कि आपली turn आणि एकत्रितरित्या आमची गाणं म्हणायला सुरवात होणे, हे सगळं जमून येईल का? ह्या प्रश्नाचे उत्तर सौ. अमिता हिने काही गाण्यांची printouts काढून आम्हाला देऊन दिले. काम सोपे झाले. आम्ही परत एकदा सर्व गाणी ऐकली आणि संयोजिका आसावरी ह्यांच्याकडे पाठवण्यासाठी एक प्रश्नावली तयार केली. प्रत्येक weekend ला आणि जमेल तसे एका week-day ला सरावासाठी भेटण्याचे ठरले. zoom किंवा online meetings करता आल्या असत्या, पण in-person भेटणे जास्त श्रेयस्कर वाटले. काही वेळा practice करताना कधी कोणाची पट्टी वर तर कधी कोणाची खाली होत असे.

कधीतरी एखादा शब्द, गाणं म्हणताना चुकून कोणाकडून उशिरा संपला, तरीही कोणी कोणाची चूक काढली नाही. "परत एकदा practice करूया"



असे म्हणून अचूक performance देण्याकडे आम्ही लक्ष दिले. अचूक आणि यशस्वी प्रयत्न झाला कि सौ. विदुलाताई, आमचे गाणे record करायच्या आणि group पाठवून देत असत. मग घरीही आम्ही सर्वानी ह्या गाण्याची practice केली. एरव्ही गुणगुणत असणाऱ्या गाण्याचा असा अभ्यासपूर्ण प्रवास झाला.

विशेष म्हणजे सरावाच्या दरम्यान आमच्यापैकी एकालाही ' आपले स्वतःचे एखादे सादर करावे असे वाटले नाही. Chorus चा हा घेतलेला वसा teamwork करून पूर्णत्वाला नेणें, हेच एक लक्ष्य होते.



मी, सौ. कांचन, सौ अक्षदा, सौ. प्रांजली, सौ. अमिता ,सौ. नेहा, आणि सौ. विदुला ताई, तसेच श्री. निलेश, श्री सुनील, श्री श्रीवल्लभ, आम्ही सगळयांनी practice host केली. विशेष म्हणजे सौ. नेहा हिचे बाळ ४ आठवड्याचे होते, तरीही तिने practice खूप उत्साहाने पूर्ण वेळ देऊन attend केली. तसेच प्रत्येकाच्या घरच्या members ने हि मदतीचा हातभार लावला.

१५ सप्टेंबर २०२४ , कार्यक्रमच दिवस उजाडला. साक्षात गणपती बाप्पा समोर आणि श्रीधरजी आणि त्यांची team, ह्यांच्या समवेत हा सुरेल गीतांचा संगीतमय कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला. श्रीधरजींनी आमचे केलेले कौतुक आणि आशीर्वाद ह्याची पावती आम्हाला मिळाली. त्यांच्या अमेरिकेमधील प्रत्येक state मधील ह्या कार्यक्रमाच्या त्यांच्या सेतू मध्ये आम्ही सर्वांनी खारीचा वाटा उचलला, ह्याचे आमच्या ९ जणांच्या चेहऱ्यावर समाधान होते. मी,ह्या सर्वांचे कौतुक, अभिमान आणि आभार मानते.


खरंच ह्या महान व्यक्तीसोबत गाणं म्हणण्याची सुवर्णसंधी आणि भाग्य आम्हाला लाभले.

परमेश्वराने प्रत्येक माणसाला
एक स्वर देऊन पाठवलेलं आहे..
अंतर्मनातल्या वीणेवरती तो सूर
सतत वाजत असतो..
बाहेरच्या गोंगाटाकडे थोडं दुर्लक्ष केलं
म्हणजे तो सूर ऐकू येतो..
तो सूर ऐकू आला
म्हणजे जीवन महोत्सवासारखंच होतं..

- व. पु.

•●•



चित्रकार: रीतू चक्करवार

कष्टांमुळे भविष्यकाळ चांगला होतो
आणि आळसामुळे
वर्तमानकाळ !

# बाप

## - स्व. शिरीष कणेकर



**परवा एका चाहत्यानं मला 'मेसेज' केला तो असा होता,

'आपण लहानपणी वडिलांच्या खांद्यावर बसून देवदर्शन घ्यायचो, पण देवाचं दर्शन घेताना आपल्याला समजत नव्हतं की, आपण देवाच्याच खांद्यावर बसलोय.'

माझे डोळे डबडबून आले. हे असं का व्हायला लागलंय अलीकडे? पूर्वी असं कधीच होत नव्हतं. रडू यायला हवं तिथंही यायचं नाही अन् आता लहानसं निमित्तही पुरतं. चित्रगुप्ताचे पहारेकरी दिसायला लागल्यावर हे असं होत असावं. इहलोकीची भाडेपट्टी संपत आल्याच्या जाणीवेतून मन हळवं होत असलं पाहिजे, पण ते तरी का व्हावं? या जगाशी माझं पटत नाही, या जगाशी माझं कधी जमलं नाही. मग 'स्वगृही' जाताना किंवा जायच्या कल्पनेनं मला संतोष व्हायला हवा. तिथं म्हणजे आई-अण्णा, आजी-आजोबा, मावश्या सगळे असणार. ते माझ्या वाटेकडे डोळे लावून बसले असतील की पृथ्वीवरील माझं वास्तव्य वाढावं यासाठी देवाकडे शब्द टाकत असतील?

माना न माना, पण आईच्या तुलनेत बाप हा नेहमीच उपेक्षित राहत आलाय. आई, तिचं प्रेम, तिचा त्याग सगळं डोंगराएवढं असतं. बाप हा लहानसा उंचवटा असतो. डोंगरापुढे उंचवट्याचा काय पाड? तो आईपेक्षा उंच, आईपेक्षा मोठा होण्याचा कधीही प्रयत्न करीत नाही. त्याची आईशी स्पर्धा नसतेच मुळी. तो आपला घरात असतो एखाद्या पेपरवेटसारखा, फुलदाणीसारखा. तो आईचं कुंकू असतो, मुलांचा आधार असतो, पण त्याच्या वागण्याबोलण्यातून तसं कधीही तो दाखवत नसतो. मुलांना त्यांच्या जीवनातील बापाचं स्थान खूप उशिरा कळतं. कधी कधी कळतच नाही. काही घरांत तो बिनपगारी गडी असतो, काही घरांत तो सर्व समस्यांचं मूळ समजला जातो. त्याला कधीच आईचं वलय नसतं. दुःख आईचं, शोक आईचा, यातना आईच्या, पुत्रवियोग आईला, याला कुठं काय पडलंय? त्यानं थोडंच मुलाला जन्म दिलेला असतो? त्यानं थोडाच नऊ महिने भार सोसलेला असतो? त्यानं थोड्याच प्रसूतिवेदना सोसलेल्या असतात? पितृत्व असंच अलगद त्याच्या मांडीवर येऊन पडतं. आईचा नवरा म्हणून तो बाबा होतो म्हणून काय मुलं त्याला आईच्या बरोबरीनं स्थान देतील की काय? आई 'मेन' असते, बाप फार तर 'सपोर्ट स्टाफ' असतो. या लादलेल्या दुय्यम भूमिकेबद्दलही त्याची काही तक्रार नसते. पुत्रप्रेमाच्या रेसमध्ये तो नसतो म्हणून मागे पडल्याची खंतही त्याला नसते. त्यानं राबराब राबायचं, पै पैसा जोडायचा, मुलांची तरतूद करून ठेवायची (व एके दिवशी आवाज न करता मरून जायचं). त्याचं कामच आहे ते. त्यासाठीच तो जगात आलाय. करतो तर काय उपकार करतो का? 'ब्लडी क्लेरिकल मेंटॅलिटी!' आमच्याकडून मात्र त्यांनी कसलीही अपेक्षा बाळगायची नाही. आम्ही काय धंद्यातली गुंतवणूक होतो?

कधी कधी मात्र या बापाचं भाग्य फळफळतं. बहुधा तो गेल्यावर. पोटची पोरं त्याच्या आठवणीनं व्याकूळ होतात. 'अब पछताये क्या होत जब चिडिया चुभ गयी खेत'. माझा एक जवळचा मित्र एकदा असाच बापाच्या आठवणीनं कसनुसा झाला होता. "ते कापडाच्या दुकानात विक्रेते होते" हातातील रिकाम्या ग्लासाकडे बघत तो म्हणाला, "मी जाहिरात क्षेत्रातला माणूस. पार्ट्या नेहमीच्याच. मी अनेकदा पिऊन घरी यायचो. त्यांना ते मुळीच रुचायचं नाही, पण ते कधीही एक शब्द बोलले नाहीत. ते घाबरायचे रे मला, घाबरायचे...."

तो घळघळा रडायला लागला. काही न बोलता मी त्याचा ग्लास भरला. चिता काय जाळेल असा पश्चात्ताप जाळतो.

एकदा मी रस्ता क्रॉस करीत असताना मोबाईल वाजला. अनोळखी नंबर होता. नाशिकहून एक निवृत्त वृद्ध म्युनिसिपल कमिशनर फोनवर होता. "तुम्हाला सांगावंसं वाटलं म्हणून फोन केला" असं म्हणून तो त्याच्या वडिलांविषयी सांगू लागला. मध्येच उन्मळून म्हणाला, "पन्नास वर्षे झाली त्यांना जाऊन, पण हरामखोर अद्याप डोक्यातून जात नाही हो...."

माझ्या अंगावर सरसरून काटा आला. 'हरामखोर' या शिवीतून इतकं प्रेम, आपुलकी, जिव्हाळा ओथंबून येऊ शकतो हे एरवी मला खरंच वाटलं नसतं. माझ्या आसपास गाड्यांचे हॉर्न वाजत होते.

मी रस्त्याच्या मध्ये उभा होतो याचं मला भान नव्हतं. हरामखोर....

साटम नावाचे माझे पोलीस खात्यातले करारी आणि कणखर मित्र. शिवाजी पार्क जिमखान्याच्या हिरवळीवर ते मला त्यांच्या वडिलांच्या कडक शिस्तीच्या गोष्टी सांगत होते. “अहो, शिस्त म्हणजे काय? ते हातानं नाहीत तर काठीनंच मारायचे. चोरांनादेखील आम्ही कधी असं मारलं नाही....”

एकाएकी काठीनं झोडणाऱ्या वडिलांच्या आठवणीनं साटमना रडू कोसळलं. तो पहाडासारखा पुरुष लहान मुलासारखा रडत होता. आता ती काठी कोमल फुलांची झाली होती.

तरुण डॉक्टर मुलगी अकाली गमावलेल्या श्रीमती नंदिनी मथुरे यांनी पेपरात दिलेल्या श्रद्धांजलीच्या जाहिरातीत म्हटलं होतं, “स्वर्गात व्हिजिटिंग अवर्स असायला हवे होते.”


बाप गमावलेल्या सगळयांची अगदी हीच भावना असणार!

- श्रीमती. भारती कणेकर यांच्या सौजन्याने

•●•



स्वत:चं मन मारून
कष्ट करणारं
शरीर आणि
काळजी करणारं
मन म्हणजे..
बाप



# मला आवडलेली सुभाषिते-3

- श्रीकांत लिमये

सुभाषित म्हणजे चांगलं वचन, चांगलं बोलणं. हे नुसते चांगले उद्गार नाहीत. सुभाषितांमधून मानवी जीवनमूल्यांची अभिव्यक्ती, त्यांचं दर्शन होतं आणि ते सुद्धा अतिशय आकर्षक पद्धतीने. चांगलं-वाईट, उदात्त-अनुदात्त, धर्म-अधर्म, योग्यायोग्यतेचा विवेक, जीवनाचे आदर्श काय असायला हवेत? व्यवहारात, जगात वागावं कसं? याचं मार्गदर्शन सुभाषितांतून होतं. नेहेमीच्या व्यवहारातली अगदी चपखल उदाहरणं सुभाषितांमधे दृष्टांतासाठी येतात. त्यामुळे कविला जे सांगायचं आहे ते सहज समजेल आणि पटेल अशा प्रकारे वाचक-श्रोत्यांपर्यंत पोचतं. सुभाषितांमधे आलेल्या उपमा, उपमानं आणि दृष्टांत पाहिले की सुभाषितकारांच्या निसर्ग तसेच सामान्य व्यवहारिक घटनांच निरक्षण किती विलक्षण होतं याची जाणीव होते.

लहानपणी शाळेत पुस्तकात वाचलेली आणि ज्येष्ठ नातेवाईक, परिचितांकडून ऐकलेली सुभाषितं आपल्यापैकी बऱ्याच जणांना थोडीफार तरी आठवत असतील. इयत्ता आठवीत संस्कृत विषयाच्या तासाला "हंसो श्वेतो बक: श्वेत: को भेदो बकहंसयो:?, नीरक्षीरविवेकेतु ह्ंसो हंसो बको बक: ॥" या किंवा "काक: कृष्ण: पिक: कृष्ण: को भेदो पिककाकयो:?, वसंतसमये प्राप्ते काक: काक: पिक: पिक: ॥" अशा एखाद्या सुभाषितापासून झालेली सुभाषितांची ओळख एखाद्या व्यक्ती बरोबरची मैत्री जशी हळुहळू वाढत जावी तशीच वाढत गेली.

सुभाषितांच्या सौन्दर्याच आणि माधुर्याच माहात्म्य वर्णन करताना कुणा कविने अतिशय सुंदर, गंमतीदार कल्पना केली आहे.:

> द्राक्षा म्लानमुखी जाता, शर्करा च अश्मतां गता
> सुभाषितरसस्याग्रे सुधा भीता दिवं गता ॥

कवि म्हणतो, सुभाषितरसाची गोडी पाहून मधुर द्राक्षं तेजहीन झाली, सुकून गेली (त्यांच्या मनुका झाल्या), गोड साखर स्तंभित झाली, दगड झाली (तिची खडीसाखर झाली) सुभाषितांच्या मधुर रसापुढे अमृत तर भिऊन स्वर्गात पळून गेले (ते पुन्हा पृथ्वीवर फिरकले नाही)!

सुभाषितांचे श्लोक वृत्तबद्ध असल्यामुळे ते पाठ व्हायला मदत होते. काही सुभाषितं त्यांच्या वृतांच्या चालीमुळे म्हणायलाही सोपी आणि आकर्षक होतात.

लहानपणी पाठ केलेली सुभाषितं आपल्या नकळत आपल्यावर होणाऱ्या सुसंस्कारंमुळे आपल्या जडणघडणीत मोलाची ठरतात. लहानपणी पाठ करताना कदाचित त्या सुभाषितांच्या अर्थाचं गांभीर्य आणि खोली आपल्याला लक्षात येत नसली तरी आपल्याला ती नंतर आयुष्यभर उपयोगी पडतात, मार्गदर्शक ठरतात.

संस्कृत साहित्यात विखुरलेली सुभाषितं खरोखर समुद्रात शिंपल्यांमधे सापडणाऱ्या पाणीदार मोत्यांसारखी आहेत. हे मोती, ही रत्ने आपला सांस्कृतिक ठेवा आहेत. अशा अनेकानेक सुभाषितांमधली मला आवडलेली अन् कदाचित त्यामुळे लक्षात राहिलेली सुभाषितं पुढे दिली आहेत.

ही सगळी खाली दिलेली सुभाषिते सामर्थ्य (शक्ती, बळ) आणि शील, चारित्र्य या गुणांचे महत्त्व सांगणारी आहेत. जगाची भाषा कोणती? असा प्रश्न जर गप्पांमधे आला तर आपल्याला इंग्लिश, फ्रेन्च किंवा संस्कृत, हिंदी अशी निरनिराळी मते मिळतील.

पण खरं तर जगाची भाषा आहे सामर्थ्य. मग ते सामर्थ्य शारीरिक, शस्त्र-अस्त्रांचे असो वा बौद्धिक, आर्थिक, तंत्रज्ञानाचे असो. विचार करून बघा. त्यामुळे सामर्थ्यसंपन्नता हा अतिशय महत्त्वाचा गुण ठरतो. तथापि चारित्र्यशून्य सामर्थ्य हे व्यर्थ नसलं तरी समाजविघातक होऊ शकतं. त्यामुळे सामर्थ्या बरोबरच सुशील, चारित्र्यवान असणं हाही महत्त्वाचा गुण आहे. उदाहरणार्थ पहा की एखाद्या गांवामधे शक्तिसंपन्न पहिलवान असतो, तसच एखादा बलवान गावगुंड असतो. दोघेही सामर्थ्यशाली आहेत. पण गांवकऱ्यांना पहिलवानाचा आधार वाटतो तर गांवगुंडाची दहशत असते. हा फरक चारित्र्याचा आहे.

नेहेमीच्या शब्दार्थ, अन्वय आणि मग अर्थ या प्रकारे मांडणी न करता, सुभाषितांचा सरळ अर्थ दिला आहे ज्यामुळे, मला वाटतं, तांत्रिक क्लिष्टतेत न सापडता अर्थ समजायला सोपा जाईल.

> अश्वं नैव गजं नैव व्याघ्रं नैव च नैव च
> अजापुत्रं बलिर्दद्यात् देवो दुर्बल घातक: ॥

(सुभाषित रत्नाकर)

यज्ञामधे पूर्वी बळी देत असत. सुभाषितकार म्हणतात की यज्ञात कोणाचा बळी दिला जातो? घोड्याचा नाही, हत्तीचा नाही, वाघाचा तर नाहीच नाही. यज्ञात बोकडाचा बळी दिला जातो. (कारण) देवसुद्धा बलवानाचा नाही तर दुर्बळाचा घात करतात.

वनानि दहतो वन्हे सखा भवति मारुत:

स एव दीप नाशाय कृशे कस्यास्ति सौहृदम् ॥ (पंचतंत्र)

जंगलामधे लागलेल्या अग्नीला, वणव्याला त्याचा मित्र बनून वारा आणखी भडकवतो. पण तोच वारा पणती, दिव्याची ज्योत विझवतो. कृश, दुर्बळाशी कोणीही मैत्री करीत नाही.

धूमो वायोरिव वशं बलं धर्मोऽनुवर्तते

अनीश्वरे बलं धर्मो द्रुमं वल्लीव संश्रिता

वश्यो बलवतां धर्म: सुखं भोगवितामिव

नास्त्यसाध्यं बलवतां सर्वं बलवतां शुचि ॥

(महाभारत शांतिपर्व)

जसा धूर त्याच्या हालचालीकरता वायूवर अवलंबून असतो, तसाच धर्मसुद्धा सामर्थ्यावर अवलंबून असतो. वृक्ष आणि वेलीं यांमध्ये जशी कमकुवत असणारी वेल आधारासाठी वृक्षावर अवलंबून असते तसाच धर्मही बलवंतांवर अवलंबून असतो.

बलवानाला धर्म वश असतो. तो म्हणेल तोच धर्म अशी व्याख्या होते. उपभोग घेणाऱ्यालाच सुखाची प्राप्ती होते. शक्तिशाली मनुष्याला काहीही असाध्य नसते. सामर्थ्यवानासाठी तो जे करेल ते सगळे शुद्ध, पवित्र असते.

अप्रकटीकृत शक्ति: शक्तोपि जनस्तिरस्क्रियां लभते

निवसन्नन्तर्दारुणि लङ्घ्यो वन्हिर्न तु ज्वलित: ॥ (पंचतंत्र)

सामर्थ्य जर उघड दिसत नसेल, अप्रकट असेल, तर बलवानाचाही अनादर केला जातो. जसं, लाकडामधे लपलेला, अंगभूत असलेला, अग्नी लोक सहज ओलांडून जातात. तोच जर प्रज्वलित, पेटलेला असेल तर लोक त्याचा आदर करून तो ओलांडण्याचं धाडस करीत नाहीत.

ऐश्वर्यस्य विभूषणं सुजनता शौर्यस्य वाक्संयमो

ज्ञानस्योपशम: श्रुतस्य विनयो वित्तस्य पात्रे व्यय:

अक्रोधस्तपस: क्षमा प्रभावितुर्धर्मस्य निर्व्याजता

सर्वेषामपि सर्वकारणमिदं शीलं परं भूषणम् ॥

(भर्तृहरि नीतिशतकम्)

ऐश्वर्याचं, श्रीमंतीचं भूषण सज्जनपणा. शौर्याचं संयमित, स्वत:ची प्रौढी न मिरवणारं, आढ्यता नसलेलं बोलणं. ज्ञानाचं भूषण मनाची स्थिरता, (मन:) शांती. विद्येचं भूषण विनम्रता. धनसंपत्तीचं भूषण योग्य कारणासाठी, योग्य व्यक्तीसाठी, सत्पात्री खर्च. तपाचं, ज्यांनी तपाचरण केलं आहे, जे तपस्वी आहेत, त्यांचं भूषण आहे अक्रोध म्हणजे न रागावणं. बलवंतांचं, समाजातील प्रभावशाली व्यक्तींचं भूषण क्षमाशील वृत्ती. तर धर्माचं भूषण सरळपणा, निष्कपटी वृत्ती हे आहे. या सर्वांमधेही, या सर्वांच कारण जे आहे ते शील, चारित्र्य हे सर्वात श्रेष्ठ असं आभूषण आहे.

विदेशेषु धनं विद्या व्यसनेषु धनं मति:

परलोके धनं धर्म: शीलं सर्वत्र वै धनम् ॥ (भारतमञ्जरि)

परदेशात असता तेव्हा तुम्ही घेतलेलं शिक्षण, तुमच्याजवळ असलेली विद्या हे तुमचं धन आहे. व्यसन म्हणजे संकट. संकटात सापडलेले असताना तुमची बुद्धी हे तुमचं धन आहे. इहलोक सोडल्यावर, परलोकी, तुम्ही जपलेली धार्मिकता (नैतिकता, सदाचरण, कर्तव्यपरायणता) हे तुमचं धन आहे. तुमचं शील म्हणजे चारित्र्य हे सगळीकडेच तुमचं धन आहे.

वृत्तं यत्नेन संरक्षेत् वित्तं एति च याति च

अक्षीणो वित्तत: क्षीणो वृत्ततस् तु हतो हृत: ॥ (विदुरनीति)


आपलं चारित्र्य, शील, वर्तणूक नेहेमी सांभाळावी. धन, संपत्ती येते आणि जाते. जो धनाने क्षीण, कमकुवत आहे तो खरं म्हणजे काही क्षीण वा कमकुवत नाही. ज्याचे चारित्र्य, वर्तणूक चांगली नाही, कमकुवत आहे तो खरं तर मेल्यासारखाच आहे.

कुलीनमकुलीनं वा वीरं पुरुषमानिनम्

चारित्रमेव व्याख्याति शुचिं वा यदि वाऽशुचिम् ॥

(वाल्मीकि रामायण)

पुरुष (कोणीही व्यक्ती) स्वत:ला कुलीन म्हणजे चांगल्या कुलातला, घरंदाज किंवा अकुलीन म्हणेल; अथवा स्वत:ला वीर समजेल. परंतु केवळ चारित्र्यावरूनच एखादी व्यक्ती निर्मळ, पवित्र आहे की कलंकित, अपवित्र आहे याचा निर्णय होईल.



# माझ्या सुनेची सासू

- मीना दीक्षित

हिंदुस्थानातला महाराष्ट्र ! महाराष्ट्रातल पुणे!! पुण्यातल्या सुशिक्षित घरातल्या नव्या सुनेची मी नवी सासू.

ह्याच घरात, मी बरेच वर्षांपूर्वी 'सून' म्हणून आले होते त्यामुळे आतापर्यंत माझ्यात सूनपणा पूर्णपणे मुरलेला आहे. सासूकडे सासू म्हणून बघणारी आमची पिढी. हे नातं मोठ्यांचं आणि छोट्यांचं, म्हणजेच थोड्याफार प्रमाणात मालक नोकराचच होतं. म्हणजे हे नातं आत्ताच्या प्रमाणे आई मुलीचं न होता 'सासु सून 'असच राहिलं होतं.

आता तर आम्हीही "सुंदर सासू" होण्याच्या प्रयत्नाला लागलो आहोत तर! "साऽऽ सू सारखं वागण्याचं मनोमनी ट्रेनिंग सुरु केलय मी! तुम्हाला म्हणून सांगते, सासु सुना दोघीही नव्यानं आपलं आपलं नातं सांभाळत असताना प्रथम एकदोन वर्षे सगळ्यांचे गोड प्रेमाने ओथंबलेले आवाज येतात सूर येतात. सणवार दिसवून साजरे केले जातात .पण अगदी बारकाइन लक्ष दिल तर आपल्याला त्यात कधीकधी थोडीफार खुस फूस कानी येतेच येते. बाहेर दर्शनी सगळंच गोड गोऽ ड दिसत. इथेच तर सगळं फसत. म्हणूनच सातत्याने लक्ष ठेवावे लागत.

म्हणून नव्याने लग्न झालेल्या मुलांच्या आई-वडिलांशी मी आता खूप मैत्री करायला लागले आहे. त्यांच्या घरात, वागण्या बोलण्यात, बारकाईने लक्ष ठेवायला लागले आहे. आता सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. हे सासु सुनेचं नातं जेव्हा नवीन असतं ना, तेव्हा सगळं कसे सगळे सणवार सजवून दाखवून साजरे केले जातात. अगदी मधाळलेले शब्द कानी पडत असतात. पण अजिबात गाफिल राहून चालत नाही बर, अधि मधि कधी तरी एकमेकींच्या समोर किंवा माघारी किंचित् नाखूषी, धुसफूस आपल्या कानी आली किंवा नुसती शंका जरी आली तरी आपल्याला सतर्क, जागरूक असावच लागत. हे असले अनुभव म्हणजे च तर आपलं सासूपणाच खास ट्रेनिंग आहे. मी तर अश्या वेळी काया वाचा मने लक्ष ठेऊनच असते. म्हणून पाकाळलेली ही २/४ वर्षे संपली की सासूला सावध असावच लागत. आपल्या संसार रथाचा लगाम पक्का धरून ठेवायचा आहे ह्याचे भान सतत ठेवावे लागत. केस काळे करवून, शुभ्रकुंदकळ्या बसवून का होइना स्वतः कर्तुत्ववान तरुण सासू असल्याचा भाव सात्तत्यानेमनात जागृत ठेवावा लागतो. लगामाची पकड ढिली होऊ नये म्हणून शक्ती खर्च करावी लागते. पकड सैल



झाली तर सुनेच लक्ष असल्याच सतत जाणवत असत. चित्रपटातल्यासारखा वरकरणी किल्ल्यांचा जुडगा सुनेच्या स्वाधीन केलेला असला तरी लपवून ठेवलेली बँकेच्या लॉकरची किल्ली आपल्या लगामी हाती पक्की धरायची असते. न जाणो सगळंच हातच सुटल तर! अश्या अनेक 'जर तर' चा विचार सावधपणान करावा लागतो. अश्यातच ७/८ वर्ष जातात. एक दोन नातवंड मागे पुढे खेळु पळु लागतात. सासूच्या हातात, वागण्यात, बोलण्यात वयाची कातरता जाणवायला लागते. अश्यातच सुनेचा आवाज जाडसर, कडक होउन कानावर आदळायला लागतो. म्हणजे आपलीच सून सासू होण्याच्या प्रयत्नाला लागते म्हणा ना. हातातल्या लगामाची बरीच रस्सीखेच होते. आणि अजाणता क्षणी हा लगाम सुनेच्या हातात जातो. खरतर जायलाच पाहिजे असतो म्हणा! जास्त ताणता येणारच नसत आता पण —लगेच मान्य करण मनाला क्लेशदायी वाटत असत.

अहो मंत्री, संत्री, राजे महाराजे कुण्णी कुण्णी आपला अधिकार सहजासहजी सोडायला तयार नसतात. आणि सासवांनी मात्र सून आली की, "सगळ्यातून लक्ष काढून निवृत्त व्हाव —" असं आणि तसं सांगणाऱ्याला सोप वाटत! पण वागणाऱ्याला हा बदल एकदम अवघड नाही का वाटणार? त्यातून एकत्र कुटुंबाच्या लफ्फेदार गप्पा मारणारी आमची ही जुनी पिढी! नवनव्या गोष्टी मान्य करतोच ना? घाई का करता आम्हाला निवृत्त करण्याची?

पुर्वी पासूनचे सासू -सून संबंध बघा ना अभ्यासून. हळु हळु बदल होतोच आहे ना? सासूच्या सासूबाई आठवतात तरी ना? पाटा, वरवंटा, कुसळ

मुसळ, ताक रवी कसल तरी काम करत, किंवा कुठले तरी स्तोत्र पुटपुटत, देवपुजा करत, जपमाळ हातात घेउन जप करत सूनेच्या खोलीवर घारी सारखी नजर ठेऊन असायच्या. नंतरच्या सास्वा मिक्सर, कुकर, धूळझाड यंत्र, टि.व्ही. कशाचा ना कशाचा आडपडदा लावून सूनेवर बारकाइन लक्ष ठेवायच्याच कि नाही? आणि आता आम्ही अनुलोम -विलोम ध्यान, योगाऽऽकरतो. व्यायामापरी व्यायाम तर होतोच शिवाय लक्ष द्यायला साध सरळ आणि सोप्प !!

आणि माझी सून सासू झाली की "वर्क फ्रॅाम होम" च तुणतुण वाजवत कॅाम्प्युटर च्या पडद्या मागून हेच उद्योग करणार की नाही? मग मात्र वेळी अवेळी ऐकाव लागेल तिला आपल्या सुनेचे. "तू असा जवळी, नाहीतर ऐकेल 'हम तुम एक कमरे में 'किंवा नव नविन पोषाख, हेअर स्टाइल, नट्टाप्ट्टा फिदा करणाऱ्या ह्या अदा पहाव्याच लागतील. सांगणार कुणाला?

म्हणून तर म्हणते "हे सगळं असण, त्या त्या भूमिकेच सहज वागणं असत. काळाबरोबर बदलत असत इतकच. तरीही अश्या वेळी सुद्धा "आमच्या वेळी असं नव्हत हंऽऽ असं मनाशी म्हणत माझ्यातली सासू खदखदत असते कधी ती गरजते बरसते आणि नेमकी ह्यच वेळी माझ्यातली सून गाढ निद्रेत असते.

आत्ताच पहा ना! नव्याने आलेली ही सून! काय तो अवखळपणा, नाचरेपणा!! सूनप्रकारातली भीड, आदर संकोच तर नावाला सुद्धा राहिला नाही. नवऱ्याला बरोबरीन कामाला लावण, दिर, नणंदा बरोबरीन विनोद करत फिदीफिदी हसण." बाबा बाबा "करत सासऱ्या कडून लाड करून घेणं, मला सुध्दा सहजपणे "आई " आई" करण, जन्मोजन्मीच्या माहितगारा सारखं घरात वावरण , सगळ्ळ कस नवख , विलक्षण वाटत बाई. तस चांगल-चुंगल — मोकळ छान वाटत म्हणा! पण तरी सुध्दा आपल्यातली खदखदणारी सासू नेमकी अश्या वेळी धुमसतच असते.

अगदी आत्ताचच बघा म्हणजे कळेल. कसे उलट सुलट हाल चालू असतात आपले ह्या नात्या मुळे———

मी माझ्या गावातल्या लेकी कडे जाउन येण्याची गोष्ट नुसती बोलण्याचा अवकाश, माझ्या सुनेला किती आनंद झाला म्हणून सांगू? मला पटकन चहा करून दिला. आईला लगेच "रिक्षा करून दे" म्हणून नवऱ्याला घाई करायला लागली . एकदम हर्ष झाल्या सारखीच वागायला लागली की! तिचा सगळा कावा लक्षात न येण्या इतकी मी काही दुधखुळी नाही म्हटल!!. मी निघाले आणि काहींतरी विसरल्याचे नाटक करून घरात परतले. माझा अंदाज बरोब्बर होता तर. आपल्या आईला फोन वरून आग्रह करत म्हणत होती कीं, "सरुमावशीला पण बरोबर घेउन ये" मनातला राग गिळून मी रागान तशीच फिरले अन् थेट रिक्षेत बसले झालं.

लेकीकडे मनसोक्त गप्पा झाल्या. तिच्या सासून केलेला चविष्ट उपमा खाल्ला. चहापण त्याच करतात नेहमी. त्या स्वयंपाक घरात असल्या की आम्हाला मोकळेपणान बोलता येत हे त्यांना माहित झालं होत म्हणून बरय. थोड्या वेळाने मी घरी यायला निघाले तशी माझ्या लेकीन सासूच्या नकळत नारळाच्या वड्यांचा डबा मला देत कुजबुजली "बाबांना द्यायला विसरू नकोस !" मी झटकन डबा घेतला न् कुणाला कळायच्या आधि माझ्या हातातल्या पिशवीत कोंबला म्हणून बर झालं बाई !

लेकीने मला मायेनं रिक्षेत बसवून दिल. मी घरी पोचले लगेचच! माझ्या मनात जे खदखदत होत, तेच दृष्य मला बघाव लागलन् काय!

मी घरी आलेली बघून खिदळत असलेल्या माझ्या सूनेच्या आई आणि मावशीला घरी जाण्याची घाई झाली.

"इकडून जाणारच होतो तर हिला दोन मिनिट भेटून जाव म्हणून अचानकच आलो" असही म्हणाल्या. त्या चपला घालून बाहेर पडणार एवढ्यात आमच्या सूनबाईंनी कसलीशी पिशवी आईच्या हातात कोंबली. मी न बघितल्या सारखं केल म्हणा! अन् पटकन स्वयंपाक घरात गेले. ओट्यावर कालच केलेल्या शंकरपाळ्याचा डबा उघडाच होता ...! आता खर सांगू ? आम्ही पण सून असताना अश्याच क्लुप्त्या करत होतो म्हणा ते आठवलं सगळं ——सून असताना द्यावस वाटण आणि सासू असताना मनातल्या मनात चरफडण हे सहज घडत असत ——-ह्याचा शेवट भांडणात न होऊ देण एवढी खबरदारी घेतली की घरातल्याना आपल्या "आदर्श सासू" होण्याचा अट्टाहासाचा अभिमानच वाटतो .

घरादाराला हे उन चांदण्याच नात हवस वाटल नाही तर नवलच!!! कारण हेच नात संबंध घराला एकत्र ठेवत. खर म्हणजे त्याचा लाभ घडलेल्या पिढ्यांना आणि घडणार-या पिढ्यांना नकळत होतंच असतो.



# नानकटांची कटकट - दिवाळीनिमित्त!

- स्वप्नील पगारे

"नील उठतोस का? अरे सुट्टी आहे म्हणून काय झालं. दिवाळीचा पहिला दिवस उद्या तोंडावर आलाय. बरीच कामं बाकी आहेत. चल मला थोडी मदत कर". आईचे हे शब्द नीलच्या कानावर पडत होते खरे पण रोज सकाळी शाळेला जाण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कटकटीतून दिवाळीच्या सुट्टीनिम्मित्ताने सुटका झाली होती. लवंडलेले त्याचे जड डोळे तो हळू हळू उघडू लागला आणि पलंगाच्या शेजारून मुंबईला सकाळच्या गडबडीत कामाला निघालेल्या चाकरमान्यांसारखी घाई-गडबडीत निघालेली लाल मुंग्यांची रांग बघत बसला. घरात सुटलेल्या दिवाळीच्या फराळाच्या घमघमाटाने बहुदा त्यांनाही आमंत्रण मिळालं कि काय आणि संपूर्ण कुटुंबासोबत त्या आमच्या घरी मुक्कामाला आल्या? असं त्याला वाटू लागलं.

सकाळचे विधी आटपून, आंघोळ करून तो आईशेजारी येऊन बसला आणि "हे फराळ वगैरे करायला मी काय मुलगी आहे का. ताईला सांग ना" बोलून मोकळा झाला. आईनेही जास्त हुज्जत न घालता फक्त "ह्या चकल्या पाडायला आणि हे नानकट बेकरीतून भाजून आणायला तुझी मदत हवी" असं बोलून नीलचा भार कमी केला. बहुदा तिलाही नीलच्या सुट्टीतल्या प्लॅनचा अंदाज आला होता. फटाक्यांची यादी, खरेदी, मित्रांसोबत बनवायचा किल्ला, भरपूर फराळ खाणं, फटाके उडवणं आणि वेळ मिळाला तर शिक्षकांनी "पिक्चर अभी बाकी है" या अंदाजाने "शाळा अजून बाकी आहे" म्हणून सुट्टीत करण्यासाठी दिलेला दिवाळीचा ढीगभर अभ्यास - असा जंगी प्लॅन त्याने करून ठेवलेला.

एरवी शाळेत असताना शिक्षक बोरिंग धडा शिकवत असले कि नीलला नेहमी वाटायचं चौकात आता या वेळी काय चालले असेल? या अनुत्तरित प्रश्नाचं उत्तर मिळवण्यासाठी तो बाहेर पडला. पण मोरे मावशींचा चिवडा, थोरातांचे अनारसे, सोंडेची चकली आणि परबांच्या करंज्या याची चव त्यांच्या मुलांच्या वशिल्याने चाखून तो त्या अनुत्तरित प्रश्नासह घरी परतला. घराच्या उंबऱ्यात बसून येणारी-जाणारी वर्दळ पाहता दिसले कि दिवाळीच्या या गडबडीतही




जाधवांच्या घरी येणारी कामवाली, गादीचा कापूस पिंजून हवा आहे का विचारणारा गादीवाला, कपडे घेऊन भांडी देणारी भांडेवाली बाई, दहिवाला आणि भाजीवाला जणू काही दिवाळी नसल्यासारखे नेहमीच्या कामात गुंतलेत. नीलला ते जणू काही 'थोर' वाटले पण दिवाळी त्यांच्याही घरी असेल असं गृहीत धरून दुसऱ्या विचारात तो मग्न झाला. तेवढ्यात समोर खाकी पँट, शर्ट, डोक्यावर टोपी, खांदयावर झोळी, पॅरागॉनच्या चप्पला आणि घामटलेल्या सावळ्या चेहऱ्यावर उठून दिसणाऱ्या त्या हास्यामधला पोस्टमन दिसला. त्याने नीलकडे बघून "या पोराला विचारण्यात काही अर्थ नाही" असं मनोमनी बोलून घरात बघितलं आणि "पगारे ताई दिवाळी द्या...दिवाळी" असा आवाज दिला. आईने नीलला आत बोलावून घेतलं आणि "साखरेच्या डब्यातून दहा रुपये काढ आणि या फराळाच्या पिशवीसोबत त्यांना दे" म्हणून सांगितलं. कदाचित आई आणि पोस्टमनमधली हि "done deal" असावी असं समजून नीलने आईला काही प्रश्न न विचारता आपलं कुतुहूलाच मन मोडून ती फराळाची पिशवी दहा रुपायांसोबत पोस्टमनला दिली आणि त्या बदल्यात पोस्टमन कडून थकल्या आवाजात मिळालेल्या "दिवाळीच्या शुभेच्छां"ना त्याने मुकाट्याने स्वीकारलं.

चकल्या पाडून, भावा-बहिणीसोबत फटक्यांची यादी करून, किल्ल्याचा फेज वन संपवून दमून घरी येऊन पाय पसरून नील पलंगावर पडला पण तेवढ्यात आईने "नील चहा पिऊन हा नानकटांचा डब्बा बेकरीत टाकून ये" म्हणून फर्मान सोडले. इतर कामात मदत करायची टाळण्यासाठी बेकरीची चक्कर मस्त निम्मित होईल हे ओळखून त्याने पलंगावरून उडी मारली आणि चहाचा कप एका करंजीसोबत खाऊन रिकामा केला. आईने "३० नानकट आहे यात. नीट ने. डबा जास्त हलवू नको आणि त्या भैय्याला उद्या पर्यंत ये होनाच चाहिये असं बजावून ये" सांगून नीलला जायला सांगितलं. नील सोबत बंटी, शिऱ्या आणि पश्या बेकरीसाठी निघाले. वाटेतून येता येता किल्लावर्गणीतून जमा झालेल्या २५ रुपयांनी नवीन शिवाजी महाराज, मावळे आणि घोडे आणायचं त्यांनी ठरवलं होतं. बेकरीत डब्बा देऊन आईच्या "उद्या पर्यंत ये होनाच चाहिये" ला वजनाने बोलून नील आणि गँग तिकडून पुढच्या खरेदीला निघाले.


दुसऱ्या दिवशी संपूर्ण दिवस उन्हात किल्ल्याचे उरले सुरलेले काम संपवून त्यांवर शिवाजी महाराज, मावळे बसवून, पणत्या आणि पताके लावून चौकात एकमेव साउंड सिस्टम असलेल्या जाधवांच्या अमरला मोठ्या आवाजात "शूर आम्ही सरदार आम्हाला" लावायला सांगून किल्ल्याचे अधिकृत उदघाटन चौकातल्या मुलांनी केले. गाणे संपताच आई आवाज देते हे ऐकून नील तिच्याकडे धावत गेला. आईने हातात ४० रुपये देऊन "जा ते नानकट घेऊन ये" म्हणून पुन्हा एकदा फर्मान सोडलं. दिवसभर काम करून थकलेल्या मित्रांसोबत नील बेकरीच्या दिशेने निघाला. वाटेवर येणाऱ्या इतर चौकातल्या किल्ल्याना बघत नील आणि मित्र आमचा किल्ला किती भारी आहे असं त्या मुलांना चिडवून बोलत होते. बेकरी आली. भैय्याने "नवबालकाच्या जन्मानिमित्त पगारे कुटुंबाला सप्रेम भेट" असं कोरून लिहिलेला स्टीलचा डब्बा नीलला दिला. नीलने ते कोरलेलं वाचून डब्बा आपलाच आहे हि खात्री करून घेतली आणि घरच्या वाटेवर निघाला.

गरमा-गरम नानकटांचा चांगलाच घमघमाट पसरला होता. दिवसभर किल्ले बांधणीच्या श्रमाने थकलेल्या मुलांना त्या वासाने बेचैन केलं आणि पश्याने न राहून "नील्या यार एक नानकट दे ना" म्हणून विचारलं. नीलच्याही पाणी सुटलेल्या तोंडाला एक-दोन नानकट गट्टम करावेशे वाटले पण आईचा रागावलेला चेहरा ओळखून त्याने "नाही यार, आई ओरडेल आणि तसंही आज संध्याकाळी ताई घेऊन येईल तुम्हा सगळ्यांच्या घरी फराळ. तेव्हा खा" बोलून मित्रांचा मनात नसूनही हिरमोड केला. वाटेवर थोड्या पुढे गेल्यावर शिऱ्याला अस्वस्थ झाले आणि "यार, एक तर दे. आईला नाही कळणार तुझ्या" म्हणून नीलला विचारलं. आणि नीलने "तिने ३० मोजून दिलेत" बोलून पुन्हा एकदा आशाभंग केला. रस्त्याच्या कडेने जात असताना मित्रांचे हिरमुसलेले चेहरे नीलने अब्दुल नाव्ह्याच्या दुकानातील मोठ्या आरश्यात पहिले आणि जागीच थांबून "यार, फक्तच एकच देईन. चालेल?" असं बोलून मित्रांना चकित केलं. डबा उघडून एक एक नानकट मित्रांना आणि स्वतःला घेऊन त्याने डब्बा बंद केला आणि एका घासात सगळ्यांनी ते नानकट खाऊन एकमेकांना बघून टाळी दिली आणि घरच्या रस्त्याला निघाले.

नील घरी पोहचला आणि आईच्या लक्षात येण्याआधी नानकटांचा डब्बा किचनमध्ये अलगद ठेऊन "आई, नानकट आणले गं" बोलून पळू लागला पण तितक्यात आईने "नील थांब जाऊ नकोस" म्हणून परतीची बोलावणी केली. तिने नानकटांचा डब्बा उघडून एक नानकट बाहेर काढून नीलला देत म्हणाली "एवढ्या सुट्टीत काही कटकट न करता तू हे काम केलं म्हणून तुला हे पाहिलं नानकट". नील ते नानकट अगदी आनंदात खाऊन आपण या दिवाळीत आईला हि मदत करून काहीतरी थोर काम केलंय असं समजून त्याने तिकडून पळ काढला.

थोडं पुढे जाऊन "आम्ही रस्त्यात आधीच चार नानकटं संपवली" असं परत जाऊन आईला सांगावं आणि आपली चूक कबूल करावीशी त्याला वाटली. पण ते सांगून होणारी ‘नानकटांची कटकट’ त्याच्या डोळ्यासमोर उभी राहिली आणि ते सांगण्याचा मोह त्याने टाळला आणि भाऊबिजेनंतर एकही नानकट न खाण्याची भीष्मप्रतिज्ञा मनोमनी करून किल्ल्यावर वाट पाहत बसलेल्या शिवाजी महाराजांना एका मावळ्यासारखा दंडवत ठोकायला निघाला.





# Annual Sponsorship

**Platinum** - Mrs. Swati and Mr. Sudarshan Sathe
**Gold** - Mrs. Jayashree and Dr. Mohan Durve
**Gold** - Mrs. Smita and Mr. Nitin Samant
**Silver** - Dr. Medha Godbole
**Silver** - Mrs. Keyuri and Mr. Utkarsha Hazarnis

# Event Specific Sponsorship

**Stand Up Comedy - Mandar Bhide**

Mrs. Gauri and Mr. Jay Masurekar

**Nathuram Show Sponsorship**

Mrs. Tanmayee and Mr. Sandeep Dixit

Mrs. Snehal and Mr. Suyog Bapat

Mrs. Gayatri and Mr. Abhishek Bharadwaj

Mrs. Sandhya and Dr. Krishna Deshpande

Mrs. Sandhya and Dr. Ashok Deshpande

Mrs. Dipti and Mr. Shekhar Ganore

Dr. Anju and Dr. Shreeniwas Lele

Mrs. Neha and Mr. Suyog Shelar

Mrs. Deepa and Mr Yogesh Potdar

Mrs. Poonam and Mr. Nilesh Kulkarni

Mrs. Seema and Mr. Abhijit Kulkarni

Mrs. Preeti and Mr. Chandan Pathak

Mr. Viraj Morankar

Anonymous

**Ganpati Festival Sponsorship**

Mrs. Ketaki and Mr. Sandeep Alurkar

Mrs. Priya and Mr. Deepak Bhat

Mrs. Apurvaa and Mr. Umesh Chitnis

Mrs. Radhika and Mr. Pranav Deshpande

Mrs. Basabi and Mr. Shrikrishna Ratnaparkhi

Mrs. Meenal and Mr. Ashish Sharma

Mrs. Sushma and Mr. Sharad Wankhede

Dr. Mandakini and Mr. Yeshwant Tamaskar

Mrs. Prabha and Mr. Ashok Argekar

Mrs. Sharda and Dr. Girish Mulgaokar

**Generous Donations**

Dr. Geetu and Dr. Rupesh Raina

Mrs. Ritu and Dr. Satish Mahna

Mrs. Priya and Mr. Deepak Bhat

Ms. Ranjeeta Kini and Mr. Ashvin Kudva

Mr. Abhijeet Runwal

Mrs. Neelam and Mr. Atul Shinde

Mrs. Apurvaa and Mr. Umesh Chitnis

Mrs. Vanita and Mr. Paresh Wagh

Mrs. Preeti and Mr. Chandan Pathak

Mrs. Swati and Mr. Sudarshan Sathe

Mrs. Akshada and Mr. Prasad Thakur

Mrs. Meenal and Mr. Ashish Sharma

Mrs. Shilna and Mr. Nitin Joshi

Mrs. Keyuri and Mr. Utkarsha Hazarnis

Mrs. April and Mr. Aditya Ghatpande

Mrs. Radhika and Mr. Pranav Deshpande

Mrs. Seema and Mr. Abhijit Kulkarni

Mr. Ashwin Ghatpande


# कणकेचा उपमा

- सौ. रेखा दीपक चक्करवार

**साहित्य:** कणीक, कांदा चिरलेला, तिखट, मीठ, हळद, तेल.

**कृती:** प्रथम गॅस सुरू करून त्यावर कढई ठेवणे. नंतर कढईत तेल टाकणे. तेल गरम झाल्यानंतर मोहरी, जीरे टाकणे. नंतर कांदा टाकणे कांद्यावर लसूण अद्रक पेस्ट टाकणे. कांदा झाल्यावर तिखट, हळद पेस्ट टाकणे त्यानंतर गरम पाणी टाकावे, (अर्धा ग्लास) पाण्याला उकळी आल्यावर गॅस कमी करणे (सिमवर) करणे. नंतर पाण्यात मीठ टाकणे नंतर पाण्यात कणीक मावेल तेवढी (अर्धा ग्लास) टाकणे. मोकळी होईपर्यंत खालीवर करणे (सराट्याने लाकडी) गॅस सीमवर ठेवणे. त्यावर झाकण ठेऊन एक दोन तीन वाफ येऊ देणे. सांबार असल्यास त्यावर बारीक चिरून टाकणे.

गरम व छान उपमा तयार झाला.




मस्त आहेत ना आपले **मराठी** 12 महिने :

१) **चैत्र** नेसतो सतरा साड्या.
२) **वैशाख** ओढतो वऱ्हाडाच्या गाड्या.
३) **जेष्ठ** बसतो पेरित शेती.
४) **आषाढ** धरतो वरती छत्री.
५) **श्रावण** लोळे गवतावरती.
६) **भाद्रपद** गातो गणेश महती.
७) **आश्विन** कापतो आडवे भात.
८) **कार्तिक** बसतो दिवाळी खात.
९) **मार्गशीर्ष** घालतो शेकोटीत लाकडे.
१०) **पौषाच्या** अंगात उबदार कपडे.
११) **माघ** करतो झाडी गोळा.
१२) **फाल्गुन** फिरतो जत्रा सोळा.
वर्षा चे महिने असतात **बारा,** प्रत्येकाची न्यारीच तऱ्हा.












# NEOMM आयोजित उन्हाळी शिबिर

- अभिजीत कुलकर्णी

यंदा मराठी मंडळाने 3 ऑगस्ट रोजी मुलांसाठी उन्हाळी शिबिर आयोजित केले. 32 मुलांनी यात सहभाग घेतला. या उन्हाळी शिबिरात मुलांनी सोनसाखळी, डोंगराला आग लागली पळा पळा, विषामृत अशा मैदानी खेळांचा तसेच, संत्रा लिंबू पैशा पैशाला, चमचा लिंबू शर्यत, रस्सी खेच अशा पारंपरिक खेळांचा आनंद घेतला. गंमत म्हणजे, मुलांसोबत कित्येक पालक आणि मंडळाचे कार्यकर्ते सुद्धा तितक्याच उत्साहाने य खेळांमध्ये सहभागी झाले होते. मुलांना मराठी गोष्टी ऐकायला मिळाल्या. तात्पुरते टॅटू, स्टिकर्स, पाण्याचे फुगे वगैरे सोबत दिवसभर दंगा मस्ती धमाल सुरू होती.

मुलांनी सुखकर्ता दुःखहर्ता या आरतीचा सराव केला आणि विशेष म्हणजे आपल्या गणेशोत्सवात मुलांनी आरत्या म्हटल्या सुद्धा!

या उपक्रमात सहभागी झालेल्या मुलांना श्रीधर फडके यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

मंडळातील या सदस्यांनी शिबिराचे आयोजन केले होते

| | |
|---|---|
| आयेशा चक्करवार | स्नेहा गोवंडे-दातार |
| यश पोतदार | तन्मयी दीक्षित |
| विराज मोरणकर | प्रेरणा वर्मा |
| मीनल सुर्वे | अभिजीत कुलकर्णी |
| मनीष राय | उत्कर्ष हजरनीस |



# BMM चा प्रवास

- संदीप दीक्षित

प्रिय मित्र मैत्रिणींनो,

सर्वांना सर्वप्रथम दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा,

या दिवाळी अंकात मला माझ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या प्रवासाबद्दल काही सांगण्याची संधी दिल्याबद्दल मी सौ. अपूर्वा चिटणीस यांचे मनःपूर्वक आभार मानतो. मी या लेखाच्या उत्तरार्धात बृहन्महाराष्ट्र मंडळाचे २०२२-२४ मधील संकल्प आणि त्यांचे यश याच्याबद्दल माहिती दिलेली आहे ती तुम्ही नक्की वाचा.

मी आपल्या क्लिव्हलँड मराठी मंडळामध्ये १९९४ पासून सक्रिय सहभाग घेत आहे - स्वयंसेवक मग, समितीमध्ये सभासद, मग सचिव, मग उपाध्यक्ष, मग अध्यक्ष, मग विश्वस्त अशी कामे केली पण कधीही बृहन्महाराष्ट्र मंडळामध्ये काही काम करेन असे काही माझ्या डोक्यात सुद्धा आले नव्हते. मुले जशी मोठी झाली आणि कॉलेजमध्ये गेली आणि तेव्हा मात्र मला रिकाम्या वेळात काही तरी आपल्या समाजासाठी काही करावे असे तीव्रपणे वाटले. प्रामुख्याने इथे जे उत्तर अमेरिकेत कमिटी सीनियर कम्युनिटी आहे त्यांच्यासाठी काही करावे आणि असा विचार करता करता मला बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या उत्तररंग या उपक्रमाची थोडीशी माहिती मिळाली. या उपक्रमात काम करण्यासाठी काय करायला पाहिजे असे शोधताना मला असे उत्तर मिळाले की बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या समितीमध्ये निवडून येणे आवश्यक आहे. म्हणून मी 2019 मध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या निवडणुकीत उभा राहिलो. उत्तररंगमध्ये मी काम करेन अशा कॅम्पेनिंग मधनं मी जवळजवळ बिनविरोध निवडून आलो. मी तेव्हा सुद्धा अध्यक्ष होईन असा माझ्या डोक्यात कधीच विचार आला नाही. पण काम करता करता जसे माझं उत्तररंगचे यश वाढत गेलं, माझ्याबरोबर २० स्वयंसेवक उभे राहिले आणि माझ्या खांद्याला खांदा लावून जेव्हा आमचं काम सगळ्या उत्तर अमेरिकेमध्ये पसरलं तेव्हा मात्र मला सगळ्या लोकांकडून आग्रह होउ लागला की "तू अध्यक्ष हो. अशा प्रकारच्या कामातून आपल्या उत्तर अमेरिकेतील मराठी समाजाला खूप फायदा होईल" म्हणून मी २०२२ मध्ये अध्यक्ष पदासाठी निवडणूक लढवण्याचे ठरवले. निवडणुकीच्या प्रचारासाठी मी बऱ्याच गावांमध्ये दौरा केला - कनेक्टिकट न्यू जर्सी न्यूयॉर्क डेलावेअर. बाल्टीमोर, रिचमंड, रॅले, शार्लेट, नॅशव्हील, कोलंबस, सिएटल, व्हॅन्कुव्हर, पोर्टलँड, टँपा, अॉस्टीन , आणि ह्युस्टन. त्याच्यात माझ्या अनेक मंडळांमध्ये समिती मधल्या सगळ्या कार्यकर्त्यांबरोबर संपर्क आला आणि मी जर निवडून आलो तर माझ्यामागे बरोबर काम करायला कोण उत्सुक आहे याची माहिती होत गेली. माझी बीएमएम २.० व्हीजन आणि आपल्या कम्युनिटी साठी काम करण्याची माझी पद्धत आणि योजना सगळ्यांना आवडली आणि मी तीन उमेदवारांच्या निवडणुकीमध्ये जिंकून आलो . आपल्यासारख्या लहान मंडळातून बृहन्महाराष्ट्र मंडळाचा अध्यक्ष निवडून येणे ही तशी नवलाचीच गोष्ट होती. माझी कार्यपद्धती म्हणजे - डेलिगेशन - आपल्या या स्वयंसेवकांच्या संघटनेमध्ये सगळ्या स्वयंसेवकांना खूप काही काम करण्याची इच्छा असते, कल्पना असतात, अशा कल्पनांना अध्यक्ष म्हणून आपण फक्त खत पाणी घालायचे आणि त्यांना जबाबदारी देऊन त्यांना जसे जमेल तशा गतीने जमेल तसे काम करण्याची मुभा देणे हा माझा सगळ्यात महत्त्वाचा दृष्टीकोन होता. माझी कार्यपद्धती होती. आणि त्याच्या मुळे माझ्याबरोबर अनेक स्वयंसेवक उभे राहिले आणि आमचे काम जवळ जवळ दोनशे हजार उत्तर अमेरिकेतले मराठींपर्यत पोहोचले. बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन ही तर खूप मोठी जबाबदारी होती पाच मिलियन डॉलरचे हे अधिवेशन, त्याच्यासाठी लागणारे सगळी यंत्रणा उभी करणे आणि हे सगळे स्वयंसेवकांचे काम आहे!आपल्या कुठल्याही मंडळामध्ये जसं स्वयंसेवकांकडून काम होतं, तसेच बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनासुध्दा फक्त स्वयंसेवकच काम करत असतात. अशा प्रचंड प्रमाणात जिथे ६०००-७००० मराठी सभासद येतात त्यांच्यासाठी चार दिवस सतत काम करायचे ही खूप मोठी जबाबदारी माझ्या मित्रमंडळींनी, माझ्या सहकाऱ्यांनी खूप उत्कृष्टरित्या पार पडली आणि हे अधिवेशन खूप मोठ्या प्रमाणात यशस्वी केले. बृहन्महाराष्ट्र मंडळासाठी माझ्या खूप खूप शुभेच्छा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या ईशान्य ओव्हायो मराठी मंडळा मला काम करण्याचा जो अनुभव मिळाला त्याचा मला पुढे खूप मोठा फायदा झाला. कुठले दरवाजे कोणासाठी केव्हा उघडतील हे आपल्या कोणालाच माहिती नसतं पण माझ्या मराठी मंडळातल्या कामामुळे बृहन्महाराष्ट्र मंडळाचा दरवाजा मात्र माझ्यासाठी उघडला हे नक्की. त्याच्यासाठी मी ईशान्य ओहायो मराठी मंडळाचा ऋणी राहेन.

धन्यवाद, जय महाराष्ट्र, गॉड ब्लेस अमेरिका!

•●•

# अभिजात मराठी भाषेचा गाळीव इतिहास

- जय मसुरेकर

तीन ऑक्टोबर २०२४ ला भारत सरकारचे माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याचं जाहीर केलं. मराठी बरोबर आसामी, प्राकृत, पाली व बंगाली ह्या चार भाषांना पण अभिजात भाषेचा दर्जा मिळाला.

थोडक्यात आता पुस्तक "असा मी असामी" असो की आसामी ते आता अभिजात भाषेत असणार. कोटी फालतू असली तरी मराठीत असल्याने ती अभिजात आहे असे वाचणार्यांनी मानावे. तसेच "मी चाय पिली" अथवा "मला हे पुस्तक भेटले" ही अभिजात भाषेतील वाक्ये आहेत याची जाणीव समस्त (विशेषत: पुण्यातील) मराठी भाषिकांना असणे गरजेचे आहे. याशिवाय "पालींचे" चुकचुकणे अभिजात नसून फक्त "पालीतले" चुकचुकणे अभिजात असेल ह्याची कृपया नोंद घ्यावी. बंगाली क्रिकेटप्रेमींना हे जाणून विशेष आनंद होईल की "कोरबो, लोरबो, जीतबो" आणि "खेला होबे" ह्या घोषणाही आता अभिजात ठरल्या आहेत. तरीही आयपीएल चषक मात्र रक्तात "आयला, सचिन" हे अभिजात मराठी घोषवाक्य असलेला संघच जिंकणार आहे हे निश्चित.

सर्वात जुना मराठी शिलालेख २२२७ वर्षांपूर्वी नाणेघाटात तेंव्हाच्या राजकारण्यांनी लिहून ठेवला आहे. तेंव्हा राजकारणी आणि नाणे (किंवा खोके) यांचा संबंध पुरातन काळापासून आहे हे सिध्द होते. तो शिलालेख खाली उध्दृत केला आहे. "उध्दृत" ह्या शब्दाला अभिजात भाषेत "लिवलाय" असे म्हणतात हे महाराष्ट्रातील जनतेला ठाऊक असेलच.

मूळ शिलालेख - महारठीनो अंगीय कुल वधनस सगरगिरीवलयाय पथविय पथम विरस वस य महतो मह.

शासकीय अर्थ - महारठी अंगीय कुलातील गिरीसमुद्रवलयांकित पृथ्वीवरील वीर महान पुरुष.

खरा अभिजात अर्थ - मराठी लोकांनी अंगी जो कूलनेस गिरवलाय तो पाहून प्रथम विरस होतो मोठ्यामोठ्यांचा.
थोडक्यात

मराठी लोकांवर प्राचीन काळातील इतर भाषीक आतासारखेच खार खाऊन असायचे हे कळते.

गाथासप्तशती ह्या मराठीतील सर्वात प्राचीन ग्रंथाचा मराठीला हा अभिजात दर्जा मिळवून देण्यास मदत झाली. कमळाचा ह्या ग्रंथात ४९ वेळा उल्लेख असल्यानेच हे शक्य झाले ही केवळ एक अफवा आहे याची जाणकारांनी नोंद घ्यावी. तसेच गाथासप्तशती हा प्रेमकवितांचा संग्रह आहे. ह्यावरून हे कळते की पहिल्या शतकात का होईना पण मराठी माणूस प्रेमाने बोलू शकत असे. या ग्रंथातील बहुतांशी कविता ह्या अविवाहित तरुणींच्या दृष्टीकोनातून आणि प्रियकराला भेटण्यासंबंधी लिहिल्या आहेत. तेंव्हा पहिल्या शतकात संस्कृतीरक्षक राजकीय पक्ष आणि खाकी वर्दीतले अमरिश पुरी नसल्याने प्रेमी युगुले निःशंक भेटू शकत असत असेही कळते. संस्कृती पुरुष"प्रधान" असली तरी प्राचीन मराठी साहित्याची "सम्राज्ञी" स्त्रीच होती हेही सिध्द होते. ह्या ग्रंथाच्या निर्मितीतही सचिन पिळगावकरांचा हात होता असे खात्रीलायक सूत्रांकडून (म्हणजे स्वतः पिळगावकरच. सॉरी, सचिनजी) समजते.
अभिजात भाषेचा दर्जा एकाहून अधिक भाषांना मिळाल्यामुळे मात्र थोडा गोंधळही उडाला आहे. उदाहरणार्थ, खाद्यसंस्कृतीच घ्या. हिंदी अभिजात भाषा नसल्याने "गोलगप्पा" अभिजात नाही पण मराठीतील "पाणीपुरी"जास्ती अभिजात की बंगालीतील "पुचका"? "श्रीखंड" जास्त अभिजात की "सोंदेश" आणि हे दोन्ही पदार्थ चापल्यावर "आयला, काय मस्त आहे" म्हणणे अधिक अभिजात की "फाटाफाटी"? किंवा चव आवडली नाही तर "फालतू आहे" म्हणणे अधिक अभिजात की "छोतोरमाथा"? या सर्व महत्त्वपूर्ण शंकांवर ४०० हून अधिक विद्यापीठे आता संशोधन करणार आहेत.

एकूणच काय तर हा दर्जा घोषित करायची वेळ पाहता, जातनिहाय राजकारण करणाऱ्यांना, अभिजातनिहाय "राज"कारण करणार्यांनी धोबीपछाड देण्याचा प्रयत्न केला आहे ही नाणेघाटातील शिलालेखासारखी काळ्या दगडावरची रेघ.

•●•




लक्ष लक्ष दिव्यांनी उजळून निघो ही निशा
घेउनी येवो नवी उमेद नवी आशा
सोबत आमच्या लक्ष लक्ष शुभेच्छा
शुभ दीपावली
सौ. जयश्री आणि डॉ. मोहन दुर्वे


दिवाळीच्या अनेक उत्तम शुभेच्छा
सौ. स्मिता आणि श्री. नितीन सामंत

# भगीरथ प्रयत्न

- श्रीकांत लिमये

शिकागोचा उदय

१८३४ पासून सुरु झालेल्या ओरॅगॉन ट्रेल पूर्वीच मिशिगन सरोवराजवळच्या प्रदेशाचं सर्वेक्षण होऊन तिथे म्हणजे शिकागोमधे १८३० पासूनच लोक स्थायिक व्हायला सुरुवात झाली होती. १८३३ मधे केवळ ३५० लोकसंख्येचं शिकागो एक टाऊन म्हणून घोषित झालं. शिकागोची अधिकृतरीतीने नगर म्हणून स्थापना झाली १८३७ मधे. त्यावेळी शिकागोची लोकसंख्या वाढून झाली होती ४००० च्या आसपास. यापुढे मात्र विविध कारणांनी शिकागोची वाढ इतर पश्चिमेकडच्या विभागांच्या मानाने खूप अधिक आणि भराभर झाली.

शिकागोचं भौगोलिक महत्त्व

मिशिगन या द ग्रेट लेकस् पैकी एका सरोवराकाठी वसलेलं असल्यामुळे शिकागो हे ग्रेट लेकस् आणि महानदी मिसिसिपी यांना जोडणारं महत्त्वाचं केंद्र ठरलं. पश्चिमेकडच्या प्रदेशातून येणारी माल वाहतूक ग्रेट लेकस् मधून आल्यावर पूर्वेकडील प्रदेशात जाऊ शकली. तसेच १८४०-१८५० दरम्यान निर्मिलेल्या इलिनॉय-मिशिगन कालव्यामुळे ग्रेटलेकस् मिसिसिपी नदीला जोडली गेली आणि मिसिसिपी नदीतून दक्षिणेला लुईझिआना आणि मेक्सिकन् गल्फमधून माल वाहतुक करणारी जहाजे अन्य देशांमधे देशांपर्यंत पोहोचू लागली. याशिवाय पूर्व-पश्चिमेला जोडणाऱ्या रेलवे मार्गाची जशीजशी प्रगती होत गेली त्याने वाहतूक अधिक सुरळीत आणि गतिमान होऊ लागली. त्यामुळे तर शिकागो हे पूर्व आणि पश्चिम तसेच उत्तर आणि दक्षिणेला जोडणारे वाहतूक आणि व्यापाराचे प्रमुख केंद्र बनले.

शिकागोची वाढ

वरील सगळ्याचा परिणाम म्हणजे वेगवेगळे उद्योग आणि आणखी लोकसंख्या शिकागोकडे आकर्षित झाली. १८३७ मधे ४००० च्या आसपास असलेल्या शिकागोची लोकसंख्या १८५० मधे ३०,००० तर १८७० मधे तीन लाखाच्या वर गेली. यावरून शिकागोची वाढ किती वेगाने झाली याची कल्पना येते. या वाढीचं कारण म्हणजे उद्योगांमुळे निर्माण झालेल्या नोकऱ्या आणि चांगल्या राहणीमानाची शक्यता. हे आकर्षण केवळ भोवतालच्याच किंवा अमेरिकेतल्याच दूरच्या खेडेगांवांतून शिकागोकडे आलेला लोकांना होतं असं नाही तर परदेशातून आलेल्या स्थलांतरितांनाही होतं.

शिकागोचे प्रमुख उद्योग

शिकागोच्या या द्रुतवेगाने होणाऱ्या वाढीला कारण असणारे उद्योग तरी कुठले होते?

औद्योगिकरणामधे शिकागोचा तत्कालीन इतर प्रदेशांमधे बराच वरचा क्रमांक होता याचं प्रमुख कारण म्हणजे शिकागो बंदराशी संबंधित अनेक उद्योग, इमारती लाकूड तसेच पोलाद निर्मितीचे उद्योग आणि त्याच बरोबर इतर विविध वस्तू बनविण्याचे उद्योग व्यवसाय. जसजसे हे उद्योग-धंदे वाढत गेले तसतसं शिकागो हे मन्युफॅक्चरिंगचं मोठं केंद्र बनलं. याशिवाय शिकागो, दळणवळणाच्या आधी उल्लेखिलेल्या सोईंमुळे, मध्य-पश्चिम आणि पश्चिमेच्या जणुकाही भल्यामोठ्या धान्यकोठारातील धान्य पूर्व आणि दक्षिणेला पुरवण्याच्या व्यापाराचं मध्यवर्ती केंद्रही बनलं.

उद्योगांमुळे झपाट्यानं झालेल्या वाढीचे परिणाम इतके विविध प्रकारचे उद्योग आणि त्यांच्या वेगाने झालेल्या वाढीमुळे शिकागो निश्चितच एक प्रमुख व्यापारी केंद्र बनलं. जसजशी शिकागोची औद्योगिक केन्द्र म्हणून वाढ झाली तसतशी तिथली लोकसंख्याही त्याच प्रमाणात, किंबहुना अधिक वेगाने वाढत गेली. या उद्योगांचे कारखाने, त्यांना संलग्न असलेले लघु उद्योग, त्यांना लागणारा कच्चा माल अथवा यंत्रांचे लहान भाग निर्मिणारे तसेच ते पुरवणारे संलग्न उद्योग व्यवसाय आणि या सर्वा बरोबरच प्रचंड प्रमाणात तशीच वाढलेली लोकसंख्या यांमुळे शिकागोचं जे बलस्थान - उद्योग-व्यवसाय आणि दळणवळण अन् मालवाहतूकीचं केंद्र - होतं तेच आता जणुकाही शिकागोचं मर्मस्थान ठरलं.

द ग्रेटलेकस् पैकी एक असलेल्या मिशिगन सरोवराच्या काठी वसलेलं शिकागो अगदी सपाट समतल भूपृष्ठावर वसलं होतं. सहस्रो वर्षांपूर्वी झालेल्या प्रचंड हिमखंडांच्या (सुमारे मैलभर उंचीचे बर्फाचे थर) घसरुणुकीमुळे त्यां खालची जमिन ओरखडल्यासारखी घासली जाऊन तिथे जे खोलगट भाग तयार झाले त्यांचीच कालांतराने ते महाप्रचंड हिमखंड वितळल्यावर ग्रेटलेकस् बनली. जेव्हा यांचे पाणी मिसिसिपी नदीतून हळूहळू वाहून गेले तेव्हा वाहून जाताना चिकणमातीचा थर त्यांनी मागे सोडला आणि परिणामी शिकागो आणि भोवताल सपाट तसेच चिकणमाती असलेला बनला. एकूण दळणवळण आणि उभारणीसाठी हीसुद्धा चांगली गोष्ट होती. आपल्याला स्वाभाविकपणे असं वाटेल की घरं किंवा एकूणच नगर उभारणीसाठी सपाट जमिन असणं बांधकामाच्या दृष्टीने खूप सोईस्कर असेल. हे खरंच आहे.

पण सपाट जमिनीवर वसलेलं असल्यामुळे पाणी वाहून जाण्यासाठी जसा उतार पाहिजे तसा सरोवराकडे जाणारा उतार या शिकागो शहराला

नव्हता. त्यात भर म्हणून की काय, ज्या भूभागावर शिकागो वसलं होतं ती जमिन सच्छिद्र मातीने बनलेली नव्हती तर घट्ट मुरुमाने आणि चिकणमातीच्या मिश्रणाने तयार झालेली होती. याचा आधी लक्षात न आलेला परिणाम म्हणजे सांडपाणी लोकवस्तीपासून दूर नेण्यामधे समस्या उद्भवू लागल्या. सुरुवातीला जेव्हा नगर लहान होतं, उद्योग-धंदेही फार वाढलेले नव्हते तेव्हा याचा त्रास जाणवला नाही. पण विशेषत: शिकागोची जेव्हा झपाट्याने वाढ होऊ लागली तशी ही समस्या मोठ रूप घेऊ लागली. एकेकाळी उद्योगांचा आणि कामगारांचा जणुकाही स्वर्गच असलेलेलं शिकागो आता वस्ती करण्यास योग्य राहिलं नव्हतं, किंबहुना त्याचं रूपांतर हळूहळू नरकस्वरूप झालं होतं.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास नागरी सांडपाणी वाहून न्यायची जी काही व्यवस्था असे ती नैसर्गिक गुरुत्त्वाकर्षणावर आधारलेली असे. शिकागो अशा ठिकाणी आणि अशा भूमीवर वसलेलं होतं जिथे उताराविना ही व्यवस्था




आपोआप होणं शक्यच नव्हतं. सांडपाणीच काय, वसंत ऋतूत वा उन्हाळ्यात जर पावसाची जोरदार सर आली तर काही मिनिटांतच शिकागोच्या जमिनीच्या मातीचा चिखल तयार होऊन त्या भागाचं रूपांतर एखाद्या दलदलीच्या भूभागामधे होत असे. विलिअम बटलर ओडेन, जे नंतर शिकागोचे प्रथम महापौर झाले, त्यांनी अनुभवल्या प्रमाणे भर पावसातून जाताना अनेकदा गुढगाभर चिखलातून जावं लागे. १८४०च्या दशकात चिखलावर लाकडी ओंडके आणि फळ्या टाकून रस्ते बनवले जात. अधूनमधून एखादा ओंडका किंवा फळी सरकली वा खचली तर त्यामुळे पडलेल्या भेगांतून हिरवा-काळा द्रव भसकन बाहेर पडत असे. अशा परिस्थितीत सांडपाण्यात साचलेला कचरा स्वच्छ करण्याची एकच व्यवस्था होती, ती म्हणजे गांवात इतस्तत: भटकणारी डुकरं.

कुठल्याही मोठ्या शहराच्या प्रमुख व्यवस्था कोलमडण्याची निरनिराळी कारणं असतात. परंतु लोकसंख्या वाढीने या सर्वच व्यवस्थांवर अधिकच ताण पडतो. त्यातही शिकागोची लोकसंख्या ज्या प्रमाणात अन् ज्या झपाट्याने वाढली त्याने वेगळ्याच समस्या निर्माण झाल्या. इतक्या मोठ्या लोकसंख्येने उत्सर्जन केलेल्या नकोशा पदार्थांची विल्हेवाट लावणं महाकठीण काम होऊन बसतं. शिकागोच्या रस्त्यांवर मुळातच घोडे, डुकरे, गायी/बैल, कोंबड्या या प्राण्यांनी विसर्जित केलेल्या नकोशा गोष्टी होत्याच. शिवाय यातले काही शिकागोच्या स्टॉकयार्डस्मधे असलेल्या कत्तलखान्यात मारले गेल्यावर त्यांचे रक्त आणि टाकून दिलेला 'निरुपयोगी' भाग असायचे. यात भर पडली होती ती या प्रचंड लोकसंख्येच्या उत्सर्जनाची. एका उद्योगपतीने म्हटल्याप्रमाणे शिकागोतली नदीचे पाणी निश्चितपणे लालसर दिसत असे. या सगळ्याची दुर्गंधी तर असह्य होतीच पण मुळात निचरा नसल्याने याची भेसळ तत्कालीन पिण्याच्या पाण्यात झाली. याचे घातक परिणाम दिसून आले ते शिकागोत वारंवार उद्भविणाऱ्या संसर्गजन्य साथीच्या रोगांमधून.

वारंवार होणाऱ्या साथींच मूळ आणि १८५४ची कॉलराची साथ

त्या काळात शिकागोमधे हगवण आणि कॉलरासारख्या साथीचे रोग पुन्हापुन्हा होत असत. १८५४मधे जी कॉलराची भयंकर साथ आली तेव्हा एका दिवसात ६० लोक मृत्युमुखी पडले. याने हादरलेली जनता त्यावेळच्या प्रशासनाविरुद्ध निदर्शनास रस्त्यांवर उतरली. त्यावेळच्या नागरी व्यवस्थापनाने याचे मूळ शोधून काढले. त्या काळी जंतु-विषाणूं बद्दल शास्त्र किती प्रगत होते याची कल्पना नाही पण नगराधिकाऱ्यांनी काढलेला या साथीच्या रोगांचं मूळ सांडपाण्याचा निचरा आणि विल्हेवाट होत नसण्यात आहे हा निष्कर्ष मात्र अगदी बरोबर होता. जनक्षोभाने जागं झाल्यावर म्हणा अथवा उशीरा का होईना पण योग्य रुळावर आल्यामुळे म्हणा शिकागोसमोर आलेल्या या जहाल समस्येवर तोडगा म्हणून त्यावेळच्या नगर प्रशासनाच्या कर्णधारांनी जो निर्णय घेतला तो अभूतपूर्व आणि अकल्पनीय होता.

अविश्वसनीय प्रकल्प

या समस्येचं उत्तर म्हणून नगराधिकाऱ्यांनी जो निर्णय घेतला त्याला खरोखरच तोड नाही. सांडपाण्याची विल्हेवाट लावायची तर ते गांवापासून दूर न्यायला गटार/नाल्यातून जायला हवं. हेही नीट व्हायला अडचण अशी होती की शिकागो सपाट जमिनीवर, ज्याला उतार नाही अशा भूभागावर वसलं होतं. ही सांडपाणी वाहून नेण्याची यंत्रणा ( Sewer System) शहरातल्या रस्त्याखालून उभी करायला हवी. त्यासाठी रस्त्याखालून नळ/पाईप घालता येतील इतकी जागा हवी. म्हणजे रस्ते थोडे वर उचलायला हवे. हा अचाट निर्णय घेतल्यावर त्यासाठी काय करायला हवं याचा विचार करून सर्वप्रथम हे काम करण्याची कुवत असलेला अभियंत्याचा शोध घेण्यास सुरुवात झाली - म्हणजे जाहिरात, निविदा इत्यादी प्रकाशित केल्या गेल्या.

लवकरच, काही महिन्यांमधे असा एक अभियंता सापडला ज्याला अशा स्वरूपाच्या कामाचा, प्रकल्पांचा अनुभव होता. एलिस चेसबरो,

बोस्टनच्या वॉटर वर्कस् चा मुख्य अभियंता.

शिकागोचं अक्षरशः उद्धरण

नुसते रस्ते उचलून भागणार नाही, त्या रस्त्यांवर असलेली लहानमोठी घरसुद्धा तेवढीच उंच उचलायला हवी! यासाठी एलिसना मदतीला आला तरूण अभियंता जॉर्ज पुलमन. ह्यानीच नंतर रेलवेचे डबे, बोगीज बनवण्याचा अतिशय यशस्वी आणि भरपूर नफ्याचा उद्योग उभारला. एलिस चेसबरो यांचे वडील रेलवे मधे होते. एलिसही पूर्वी रेलवेमधे कामाला होता. तेव्हा त्याने रेलवेचे रूळ उचलण्यासाठी मळसूत्रांचा ( Jackscrew ) वापर करताना पाहिले होते. त्या तंत्राचा उपयोग शिकागोची घरे उचलण्यासाठी करता येईल हे त्याच्या लक्षात आले आणि मग एका, साऱ्या जगात प्रथमच घडलेल्या प्रकल्पाला सुरुवात झाली.

प्रकल्पाची व्याप्ती, तंत्रज्ञान आणि मनुष्यबळ

मळसूत्रे वापरून कामगारांच्या एका चमूने घर वर उचलायचे. दुसऱ्या चमूने त्याखाली जमिनीत भोके करून त्या उचलल्या जाणाऱ्या घराला आधारासाठी लाकडी ओंडके लावायचे, मग घर हवे तेवढे आणखी वर उचलायचे. तिसऱ्या संचाने लगेच त्याखाली सांडपाणासाठी नळ/पाईप टाकायचे. हे सगळे पाईप उचललेल्या रस्त्यांखाली घातलेल्या मोठ्या पाईपांना जोडायचे असं अतिशय नियोजनबद्ध काम केलं गेलं. यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ लागणार होतं. उदाहरणार्थ, मळसूत्रांनी घर किंवा अन्य इमारत एकाच वेळी एकसारखी उचालली जावी म्हणून जवळपास ६००० कामगार कामाला लावले होते. एवढ्या मोठ्या प्रकल्पाचं संयोजन आणि समन्वय करणं ही एक कसरतच होती पण ती उत्तम रीतीने पार पडली असावी. कारण पुढेपुढे या कामात सगळे इतके वाकबगार झाले की अर्धा सिटीब्लॉकभर घरे एकाच वेळी सहजतेने उचलायला सुरुवात झाली!

ही गोष्ट इतकी अद्वितीय होती की बाहेरून म्हणजे इतर प्रदेशांतून इतकेच नव्हे तर युरोपातूनही लोक प्रवास करून मुद्दाम हा उद्योग बघण्यासाठी येत असत. कारण ही घरं आणि इमारती नुसती उचलण्यात येत नव्हती तर काही वेळा दुसरीकडे हलवलीही जात असत. त्यासुमारास शिकागोत आलेल्या अशाच एका प्रवाशाने पाठवलेल्या एका पत्रात लिहिलं होतं की असा एखादाच दिवस जात असेल जेव्हा रस्त्यावरून जाताना आम्हाला थांबावं लागलं नाही. थांबायचं तेही कशासाठी? तर एखादं घर रस्ता ओलांडत असे म्हणून! हे इमारती उचलण्याचं काम खरोखरच अतिशय व्यवस्थितपणे, सुरळीत आणि सहजतेने होत असे. एक नोंद अशी आहे की शिकागोतलं त्या काळचं प्रमुख ७५० टन वजनाचं हॉटेल (विटांचं बांधकाम असलेलं ब्रिग्ज हाऊस) जेव्हा असंच उचलण्यात आलं तेव्हा त्या हॉटेलमधे सर्व व्यवहार नेहेमीसारखे सुरू होते. लोकांची हॉटेलच्या आत-बाहेर नेहेमीसारखी वर्दळ चालू होती. इतकच नव्हे तर आणखी एका नोंदीत असा उल्लेख आहे की हे हॉटेल उचलण्याचं काम इतकं व्यवस्थित किंवा काळजीपूर्वक झालं की एकाही दार अथवा खिडकीचं एकही कांचेचं तावदान फुटलं नाही!

शिकागो पुनश्च प्रगतीपथावर

अशा रीतीने अख्खं शिकागो नगर उचलून त्याखालून सांडपाण्याची प्रणाली पूर्ण करायला दहा वर्ष लागली. पण एकदा हा प्रकल्प पूर्णत्वाला गेल्यानंतर शिकागोचा जणुकाही कायापालट झाला आणि शिकागोचे उद्योग-धंदे, दळणवळण, बाजारपेठ या सगळ्याला पुन्हा उभारी आली. इतकच नाही तर हा प्रकल्प यशस्वी झाल्यामुळे लंडन, पॅरिस तसेच न्यूयॉर्कची सबवे प्रकल्प हाती घेऊन पूर्ण करण्यात आले. शिकागोच्या या प्रकल्पाचा एक नकोसा परिणाम म्हणून एक निराळीच समस्या निर्माण झाली. पण त्याबद्दल पुन्हा केव्हा तरी.

भगीरथ प्रयत्न

एखादा प्रश्न अथवा अडचण, समस्या समोर आली तर मुळात ती समस्या आहे हे ओळखून मान्य करणं. त्याचा अभ्यास करून ती समस्या निर्माण होण्याचं मूळ कारण शोधून काढणं, त्यावर उपाय काय तो शोधून काढून एकदा तो निवडला गेला की जे काही लागेल ते करून ती समस्या दूर करणं आणि सर्वांचं जीवन अधिक चांगलं कसं होईल हे पाहणं. हा द अमेरिकन वे. त्याचं हे अतिशय उत्तम उदाहरण आहे. आपल्याला सामान्यपणे ऑक्टोबर १८७१ मधे झालेल्या द ग्रेट शिकागो फायर बद्दल माहिती असते परंतु मुळात एखाद्या संपूर्ण नगराचं उद्धरण करण्याची कल्पना करणं, ते आपण करू शकू हा आत्मविश्वास असणं आणि प्रयत्नपूर्वक तसं घडवणं. याचं उदाहरण घालून देणारं हे शिकागोचं उद्धरण आपल्याला कदाचित माहिती नसतं. त्याची माहिती व्हावी म्हणून हा लेख प्रपंच.

गंगावतरणाची कथा आपल्या पुरणांत आहे. त्यासाठी भगीरथाने जे पराकाष्ठेचे प्रयत्न केले त्याने आपल्या भाषेत "भगीरथ प्रयत्न" अशी उपमा किंवा विशेषण प्रचलित झालं. सगरपुत्रांच्या उद्धारा निमित्त राजा भगीरथाने स्वर्गीय गंगा पृथ्वीवर आणून सर्व समाजाचं हित साधलं. त्याचप्रमाणे सर्व समाजाच्या आरोग्यासाठी घातक अशी गटारगंगा लोकवस्तीपासून दूर नेण्याचं महाकठीण, चमत्कारच म्हणावा असं, हे शिकागोच्या उद्धरणाचं जे अचाट काम केलं गेलं त्याला भगीरथ प्रयत्नच म्हटलं पाहिजे.

शुभ दीपावली!

# बेसन झुणका

- रीतू चक्करवार

**साहित्य**: बेसन, तेल, कांदा, टमाट असल्यास टमाट किंवा पालक,तिखट,हळद,मीठ

**कृती**: प्रथम गॅस सुरू करून त्यावर कढई ठेवणे, त्यामध्ये तेल टाकणे, तेल गरम झाल्यावर मोहरी, जिरे टाकणे. कांदा कापलेला टाकणे. कांदा थोडा लाल झाल्यावर टमाट किंवा पालक टाकणे, खालीवर करणे,नंतर त्यावर तिखट, हळद, मीठ टाकणे, खालीवर करणे, नंतर त्यावर जेवढे बेसन बसेल तेवढे टाकणे, खालीवर करणे, त्यावर झाकण ठेवणे दोन, तीन वाफ येऊ देणे, गॅस बंद करणे,त्यावर सांबार टाकणे, नंतर सर्व करणे.

झुणका तयार



चित्रकार: आरव चक्करवार



चित्रकार: आईशा चक्करवार

# ईशान्य ओहायो मराठी मंडळ सुवर्णमहोत्सव आणि मित्रमेळावा

- श्रीकांत लिमये

ऐका हो ऐका, नीट कान देऊन ऐका!

येत्या वर्षी, २०२५ मधे होणाऱ्या मित्रमेळाव्याचे यजमानपदचा मान क्लिव्हलंड ओहायोच्या ईशान्य ओहायो मराठी मंडळास मिळाला आहे. क्लिव्हलंडच्या मराठी मंडळाचे समस्त सभासद आणि मराठी प्रेमी हा कार्यक्रम घडविण्यास उत्साहाने तयर आहेत. सर्वजण २०२५च्या या मेळाव्याची उत्सुकतेने प्रतिक्षा करीत आहेत. या आगामी मेळाव्यातील कार्यक्रमाचे तपशील, आयोजन आणि व्यवस्थापन करण्यासाठी एक मार्गदर्शक समिती तयार झालेली असून ह्या समितीच्या संकल्पनेप्रमाणे या मेळाव्यासाठी आवश्यक अशा विषयांसाठी, म्हणजे सभागृह-स्थळ, स्वागत, निवास, भोजन, सांस्कृतिक कार्यक्रम, दळणवळण, सूचना इत्यादी विषयांसाठी उपसमिती ठरविल्या आहेत. त्यामधे काम करण्यासाठी समिती सभासद आणि स्वयंसेवकांची निवड करण्यास लवकरच सुरुवात होईल.




उत्तर अमेरिकेमधे स्थापन झालेल्या सुरुवातीच्या काही मराठी मंडळांपैकी एक ईशान्य ओहायो मराठी मंडळ आहे. मंडळाची स्थापना १९७५ मधे झाली. २०२५ मधेच क्लिव्हलंडच्या या मंडळाला ५० वर्षे पूर्ण होतील. त्या प्रीतर्थ्य वर उल्लेखिलेल्या मेळाव्या बरोबरच मंडळाचे सुवर्णमहोत्सवी वर्षही साजरे केले जाणार आहे. जेव्हा मंडळाची स्थापना झाली तेव्हा हाताच्या बोटांवर मोजता येतील इतकीच मराठी कुटुंब क्लिव्हलंडमधे होती. त्यावेळचे कार्यक्रमही सभासदांच्या घरी बेसमेंटमधे होत असत. इतके लहान मंडळ वाढत जाऊन आता त्याचे खूप मोठे स्वरूप झाले आहे. अशी केवळ संख्यावाढच नाही तर एखादी ना-नफा तत्त्वावर असणारी सामाजिक संस्था सलग गेली ५० वर्षे चालू ठेवणे ही साधी गोष्ट नाही, सोपी तर नाहीच. असे दोन महत्त्वाचे प्रसंग येत्या वर्षी एकत्र येत आहेत. त्यामुळे त्यांचे कार्यक्रमही मित्रमेळावा आणि सुवर्णमहोत्सवाला शोभतील अशा मोठ्या प्रमाणात करण्याचा क्लिव्हलंडकरांचा मानस आहे. या हेतुनेच वर सांगितल्याप्रमाणे मार्गदर्शक समिती आणि उपसमितींची आखणी केली आहे.

या कार्यक्रमासाठी बृ.म.मंडळाच्या सर्वांना आगाऊ निमंत्रण आहे. विशेषत: आमची शेजारी मंडळे, कोलंबस, सिनसिन्नाटी, पिट्सबर्ग, डेट्रॉइट, टोलिडो या मराठी मंडळांना नुसत्या उपस्थितीचे नाही तर सहभागाचेही आमंत्रण आहे.

येत्या २०२५च्या जूनमधे उन्हाळ्याची सुरुवात होण्या आधी हा मित्रमेळावा+सुवर्णमहोत्सवाचा असा एकत्र कार्यक्रम असेल. २१ जूनचा वैश्विक योगदिन लक्षात घेऊन जून १४-१५ किंवा जून २८-२९ या तारखा विचारात घेतल्या आहेत. लवकरच यातील एक तारखेची निवड होईल आणि ती सर्वांना कळविण्यात येईल. तेव्हा वृत्तातल्या पुढच्या दवंडीकडे लक्ष ठेवा आणि एकदा तारीख पक्की झाली की क्लिव्हलंडला या बहारदार कार्यक्रमासाठी येण्याचे नक्की करा.

•●•








# महाराष्ट्रियन मसालेभात

- राधिका पांडे

**साहित्य** : साधा तांदूळ, बटाटे किंवा तोंडले किंवा फुलकोबी, धने, जिरे, किसलेलं सुक खोबरं, तेज पान, बडी, छोटी इलायची, कलमीचा तुकडा छोटा,दही, साजूक तूप, तेल,कोथिंबीर ई.

**कृती** : प्रथम तांदूळ धुवून रोलीत ठेवावे. नंतर बटाटे /फुलकोबी / स्वच्छ करून मोठे तुकडे करावे पाणी निथळल की त्याला मीठ दही व वाटलेली मिरची लावून अर्धा तास बाजूला ठेवावे.

कढई गॅसवर ठेवावी तेल टाकावे आणि फुलकोबी किंवा बटाटे तळून घ्यावे. बाजूला ठेवावे.

धने, जिरे, खोबरं थोडी हिरवी मिरची वाटून घ्यावी.

कढईत तेल टाकावे तेल गरम झाले की तेज पान, बडी छोटी विलायची, आवडत असल्यास मिरे टाकावे नंतर फुल कोबी किंवा बटाटे टाकून परतयच, त्यावर वाटलेला मसाला टाकायचा पुन्हा परतायच. नंतर तांदूळ टाकून अरत परत करायचं चवीनुसार मीठ घालायचं दही टाकायचं पुन्हा चांगल परतयच आणि गरम पाणी टाकून शिजायला ठेवावं. शिजत आल्यावर साजूक तूप सोडायचं. चांगली वाफ येऊ द्यायची भात शिजला की वाढतांना त्यावर किसलेलं खोबरं व कोथिंबीर टाकावी, सोबत ताक कराव.













“ह्या जन्मावर, ह्या जगण्यावर”.... गाण्याचे स्वर कानावर पडले, आणि मी वेगळ्याच जगात जाऊन पोहोचले.. एकदम माझ्या बालपणात, आमच्या ओटी-पडवितल्या झोपाळ्यावर आणि ते सुद्धा चक्क माझ्या आजी जवळ! वास्तविक, मी घर आणि आजी ह्यांचा वेगवेगळा विचारच करू शकत नाही....

# पेणचे मंत्रमुग्ध दिवस: माझं घर, माझी आजी

- विदुला वच्छराजानी

आमचा “लिमये वाडा” म्हणजे अगदी टिपिकल कोंकणातले घर. ओटी, पडवी, माजघर, स्वयंपाकघर, सोपा, न्हाणीघर आणि पुढील, मागील आणि आजूबाजूची आंगणं... पुढच्या पडवितला झोपाळा हे मात्र स्पेशल ॲट्रॅक्शन. आईच्या मांडीवर डोकं ठेऊन लोळत पडण्यापासून ते स्वतःच्या मुलाला रात्री बेरात्री मांडीवर झोपवण्या पर्यन्तच्या प्रवासात त्या झोपाळयाने, कधीही न पडता, साथ दिली. ओटीवरचे भिंतीतले नक्षीदार कोनाडे (देवळ्या), त्यांच्या आजूबाजूची भिंतीवरची नक्षी, सागवानी बाकडं, आजोबांपासूनचं औषधांचं कपाट, या सर्वांची तेव्हा अजिबात किंमत नसली, तरी आता मात्र खूप आठवण येते.

ओटीवरून माजघरात प्रवेश केला, की जुन्या घराचा नैसर्गिक गारवा जाणवायचा. डाव्या बाजूच्या कोपऱ्यात देवघर, त्यातला दिवा, उदबत्तीचा सुगंध, आजही जाणवतं. देवघर म्हटलं की आजीच्या भुपाळ्या, तिचे श्लोक आठवतात. कितीतरी पाठांतर! रोज सकाळी पाच वाजल्या पासून तिची काकड आरती सुरू व्हायची आणि त्या प्रसन्न वातावरणात आमची सकाळ! “उठा उठा हो सकळजन” ही ती देवाला म्हणायची की आम्हाला, हे मला आजही गूढ आहे... आजी फारशी शाळेत जाऊन शिकली नव्हती, पण शिक्षणाचं प्रचंड महत्व! म्हणून त्या काळात ती स्वतः मराठी वाचायला, आणि लिहायला शिकली. दासबोध, मनाचे श्लोक तर अत्यंत प्रिय, ती वेळोवेळी आम्हाला म्हणून दाखवायची, समजावून द्यायची. भा. रा. तांब्यांची “जन पळभर म्हणतील हाय हाय” ही तर तिची अतिशय आवडती कविता!

देवघराच्या थोडं पुढे, गणपतीचं फडताळ. गणपतीची सजावट नसायची, फक्त त्या फडताळच्या भोवती लावायचा गणपतीचा लाकडी मखर होता. दर वर्षी तो यूनिट टेस्ट संपल्यावर रंगी बेरंगी कागद लावून तो मखर बनवायला लागलो, की उत्साहात, वाजत गाजत गणपतीची सुट्टी सुरू व्हायची. त्या माजघरात मग हरतालिका, गणपती सगळ्यांची पुजा, आरती, सगळं सगळं. कोकणातल्या रिवाजाप्रमाणे काका, काकू, आत्या, आते-चुलत भावंडं गणपतीसाठी एकत्र व्हायची. फक्त आमच्याच घरी नाही, आजूबाजूला पण. बाबांचे, काकांचे, आत्यांचे बालमित्र-बाळमैत्रिणी गोळा व्हायचे, भेटायचे. काका आणि आत्यांना पेणला बालमित्र मंडळी असू शकतात, आणि मुख्य म्हणजे ही मोठी मंडळी कोणे एके काळी लहान होती, याच गोष्टीचं नवल वाटायचं!

दिडंच दिवसाचा गणपती असायचा, पण सकाळ संध्याकाळ लांबलांब आरत्या व्हायच्या. त्या सुद्धा, आजी आणि आईच्या देखरेखीखाली. त्यातल्यात्यात आम्ही पोरं आणि आमचे बाबा प्रत्येक आरतीनंतर “घालीन लोटांगण” सुरू करून प्रसादापर्यंतचा शॉर्टकट मारायचा केविलवाणा प्रयत्न करायचो, पण आई आणि आजी तो संपूर्णपणे मोडून काढायच्या. प्रसाद मिळाला, की शेजाऱ्यापाजाऱ्यां कडे आरतीला, आणि मुख्य म्हणजे प्रसादाला जाऊन उंडारायचो.

माजघरच्या उजव्या बाजूला एका कोपऱ्यात कपडे बदलायच्या आणि दुसऱ्या कोपऱ्यात धान्याच्या खोलीची दारं पार करून गेलं, की मधल्या अंगणात जायचा दरवाजा. अंगणात जायच्या पायऱ्यांवर असंख्य वेळा पडलो, धडपडलो, चकाट्या पिटल्या, लहान भावाच्या क्रिकेट टीमची अम्पायरगिरी केली, त्याच्यावर/ त्याच्या मित्रांवर दादागिरी केली, मैत्रिणींशी/भावंडांशी भांडणं केली....कित्येक काही “महत्वाच्या”गोष्टी केल्या!

माजघर ओलांडून गेलं की स्वयंपाकघर होतं. इथे आई-आजींचे प्रांत सुरू व्हायचे. माजघरातून स्वयंपाक घरात प्रवेश केल्यावर पहिली ताकमेढी

cmd होती, आणि तिच्या जवळची जागा ही आमच्या आजीची एकदम प्रिय. ताकमेढीजवळ बसलेली आजी अजूनही डोळ्यासमोर येते आणि डोळे ओले होतात. आई आणि आजींचा संवाद अजूनही कानावर पडल्याचा भास होतो.. दोघींचं अगदी मेतकूट होतं. कधी ना भांडण, ना तंटा. आईबाबाआजी हा आमच्यासाठी, आजी जिवंत असे पर्यन्त जोडशब्द होता. स्वयंपाक घरात येणारा काचेच्या कौलांमधला प्रकाश, आजीच्या हातच्या भरल्या वांग्यांचा, थालिपीठांचा, सांदणांचा सुगंध अजूनही जाणवतो......

स्वयंपाकघरातून बाहेर गेलं की सोपा होतं. सोप्याचं आणखी काहीच वर्णन होऊ शकत नाही. तो ना धड घराचा ना अंगणाचा विभाग.....त्या सोप्यात आणि सोप्याच्या अंगणात मात्र फक्त आजीचं राज्य. तिथे ती सोनचफ्याची फुलं मोजायची आणि गड्याला विकायला द्यायची. पैशाची वाटणी चोख, दोन तृतीयांश पैसे त्याचे, आणि बाकी आजीला. आजीला सांगायचा त्याचा भाव एक आणि बाजारतला जरा जास्त, असं तो कायम तिला फसवायचा. पण गोष्ट माहिती असली तरी ती दरवर्षी गरीबाला चार पैसे मिळावे या हेतूने त्याला बोलवायची. म्हणायची, “अगं, फुलं खाली पडून आंगण घाण होतं, विकली तर त्याला चार पैसे मिळतात”. मी म्हणायची, स्वतःला फसवून कशाला घेतेस? त्या पेक्षा त्याला तू उचलून पैसेच दे ना! त्यावर मात्र मला म्हणायची “मला कुठे काय कमी आहे? त्याला शिक्षण नाही, मिळवू दे चार पैसे. उचलून पैसे दिले तर भीक दिल्यासारखं वाटेल, त्याचा अपमान होईल. कष्ट करू दे आणि कमवू दे”. गड्याच्या मानापमानाची काळजी करणारी माझी आजी वेगळीच!

सोप्यात आजीची एक मोठी चूल होती. अजूनही चूल म्हटलं की मला थेट आमच्या सोप्यातली चूल आठवते. आजीला माणसांची खूप आवड. सगळी मंडळी जमली, की तिला हुरूप यायचा. ती जमिनीवर बसून त्या वर “खास वस्तू” बनवायची. आजीची भली मोठ्ठी पूरणपोळी, फेण्यांच्या ताटल्या, सांदणं, थालीपीठं, उकडीचे मोदक सगळे प्रकार तिथे व्हायचे..... तोंडाला आजही पाणी सुटतं. पण सगळ्यात जास्त आठवण होते ती तिच्या भोवती जमलेल्या माणसांची. प्रेमाने आजीच्या जवळ गोळा झालेली तिची मुलं, सुना, मुली, जावई, नातवंड, नातसुना, नातजावई, पंतवंडं, सगळे तिच्या प्रेमापोटी जमा व्हायचे.......कोणी डॉक्टर, कोणी इंजीनियर, कोणी सायंटिस्ट, कोणी अकाऊंटंट, तर कोणी वकील.. म्हणून तिला ना कोणाची भीती, ना कोणाचा गर्व.. फक्त निरपेक्ष प्रेम. खास म्हणजे तिची नात (मी) म्हणजे तिच्या तिसऱ्या पिढीची डॉक्टर (आजोबा, बाबा आणि मी).. त्याचं कितीतरी कौतुक!

सोप्यात आजी राज्य करत असली, तरी अंगणात तिचं साम्राज्य होतं! सोप्याच्या बाहेरच्या अंगणात एक भला मोठ्ठा पाणी तापवायचा बंब. रोज सकाळी आजी त्यात अंगणातल्या “काटक्या कुटक्या”, झाडाच्या पडलेल्या फांद्यांची लाकडं वापरून आंघोळीला पाणी गरम करायची. तिला कोणीच “रिसायक्लिंग” कर म्हणून सांगायला आलं नव्हतं.. खूप काही शिकण्यासारखं. त्या बंबा पलीकडे मधलं आणि मागील आंगण.

तिचा छंद म्हणजे बागकाम. तासंतास ती बागेत काम करायची! आई तिला जबरदस्तीने घरात घेऊन यायची आणि थोडं बसायला लावायची, अगदी आमच्यासारखं! पावसाच्या तोंडी कुणाकुणा कडून फळांची फुलांची रोपं आणून लावायची, त्यांना खतं घालायची, पाणी लावून द्यायची, जगवायची. तिच्या हाताला यश खूप! तिच्या माडांना असंख्य नारळ यायचे, आणि ते आजूबाजूच्या सगळ्यांना गणपतीच्या मोदकांसाठी आम्ही वाटून टाकायचो! नारळ, सुपारी, चिकू, सोनचाफा, हापुस, पायरीची, विलायती फणस (breadfruit), आवळा, लिंबूची झाडं, केळीचं बन, जाई-जुईचे वेल, मोगरा, गुलाब, काय काय नाही? खूप फळं, फूलं, जवळ जवळ वर्षभर असायची! पुढच्या आंगणात एक मोठ्ठं जांभळाचं झाड होतं आणि त्याला खूप काळीभोर टप्पोरी जांभळं यायची. येताजाता पोरं झाडावर चढून किंवा दगड मारून जांभळं पाडायची. कायम आजी त्यांना सांगायची, “बाबांनो, घरात येऊन जांभळं खा, मी देते, पण झाडावरून पडू नका, किंवा लोकांच्या डोक्यात दगड मारू नका”. ती कुठे ऐकायला? एक दिवस आजीच्याच डोक्याला दगड लागून खोक पडली, आणि आईने रातोरात जांभळांचं झाड पडून टाकले! जांभळं नाही मिळाली तरी चालतील, पण इजा नको. साधी रहाणी, आणि साधी माणसं!

आयुष्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत माझी आजी स्वावलंबीपणे जगली. ती कायम आम्हाला सांगायची, “प्रत्येक घरात एक वास्तु पुरुष असतो. तो “तथास्तु” म्हणत असतो. तुम्ही चांगलं बोललात तर तो तथास्तू म्हणतोच, पण वाईट बोललात तरी तो तथास्तुच म्हणतो. म्हणून, कधीही वाईट बोलू नका”. माझ्या दृष्टीने माझी आजी आमची “वास्तु पुरुष” होती, आणि ती आजही आमच्या प्रत्येक इच्छेला “तथास्तू” म्हणत असते.. प्रत्येकाच्या मनातल्या घरात बसून....

छान छान गोष्टी म्हणजे आजी
लहानपणच्या आठवणी म्हणजे आजी
गोड खाऊचा डबा म्हणजे आजी
आजीची माया असतेच अशी
मनाच्या कुपीत जपून ठेवावी जशी

# झटपट पुलाव

- तन्मयी दीक्षित

१ कप बासमती

१/२ कप ३ रंगांचा कुसकुस

१ मध्यम उभा चिरलेला कांदा

१/४ कप काजू

१/४ कप बेदाणे

२ चमचे गरम मसाला

४ लवंगा, ४ दालचीनी, २ काड्या cinnamon , तेज पत्ती

१/२ कप frozen mixed vegetables

२ कप पाणी घालून भात करून घ्यावा. दुप्पट पाणी घालून कुसकुस शिजवून घ्यावं.

थोड्या तेलावर सगळा खडा मसाला घालून परतून घ्यावा. कांदा तांबूस होईपर्यंत परतून घ्यावा. काजू घालून ते परतावे. बेदाणे घालून परतून घ्यावे. Frozen vegetables घालून ते परतून घ्यावे.




एकदा 'मीपण' विकून बघा..
जेव्हा कोणीही घेणार नाही
तेव्हा समजेल किती फालतू
गोष्ट आपण इतके दिवस
बाळगत होतो.

- पु. ल.









पंगत
भोजन



# 2024 वार्षिक जमाखर्च

| Unaudited NEOMM 2024 Statement | | |
|---|---|---|
| | | |
| **Beginning Balance in Citizens on Jan 1 2024** | **$ 17,250.66** | |
| | | |
| | | Expense |
| **2023 Expense (Dhol-Tasha Performance at Cavaliers+Niyan Va Ati Lagu Balance to BMM)** | | $ 1,364.14 |
| Zoom Membership | | $ 172.69 |
| BMM Membership 2024 | | $ 100.00 |
| Assets (Food Warmers+Stands+Coffee Dispensers+Water Cooler)+Dhol Items | | $ 943.82 |
| Website Domain | | $ 229.30 |
| | | **$ 2,809.95** |
| | | |
| **Income** | | |
| Carryover from 2023 (Venmo) | $ 312.79 | |
| 2024 Annual Membership Fees (excluding 3 Life Memberships) | $ 4,009.50 | |
| 2024 Interest from Trustee Account | $ 1,872.00 | |
| 2024 Annual Sponsorship | $ 12,000.00 | |
| Sponsorship Match Received from IOBY | $ 965.76 | |
| Commercial Membership | $ 2,425.00 | |
| BMM Match for Purohitya Program | $ 100.00 | |
| BMM Match for Block Tickets | $ 592.50 | |
| Donation - Gujrati Samaj of Greater Cleveland | $ 270.00 | |
| Dhol Tasha Cavaliers Performance Sponsorship | $ 500.00 | |
| | **$ 23,047.55** | |
| | | |
| **Planned Programs for 2024** | Income | Expense |
| Makar Sankrant (January) | $ 2,612.29 | $ 2,825.11 |
| Movie - Aaichya Gawat Marathi Bol (February) | $ 300.00 | $ 300.00 |
| Stand Up Comedy - Mandar Bhide (March) | $ 2,559.50 | $ 2,350.45 |
| Gudi Padwa & Veer Sawarkar Play (April) | $ 4,080.15 | $ 7,539.10 |
| Maharashtra Jatra (May) | $ 1,767.50 | $ 1,599.26 |
| Natak - Nathuram Godse (July)* | $ 8,760.78 | $ 7,477.70 |
| Kids Summer Camp (August) | $ 10.00 | $ 367.55 |
| Ganpati Festival and Shridhar Phadke Concert (September) | $ 11,929.45 | $ 14,861.48 |
| Community Lunch - Mahaprasad Shiva Vishnu Temple (October)** | $ 928.00 | $ 836.09 |
| | | |
| Total Income/Expense for all 2024 Programs | **$ 32,947.67** | **$ 38,156.74** |
| | | |
| Total Income/Expense for 2024 | **$ 55,995.22** | **$ 40,966.69** |
| | | |
| **Remaining Balance from 2024 Operating Income** | **$ 15,028.53** | |
| | | |
| **Balance in Citizens Bank as of Nov 1, 2024** | **$ 32,279.19** | |
| | | |
| *Pending Expense of $3057.60 | | |
| **Pending Expense of $91.91 | | |

November 2024

© North East Ohio Maharashtra Mandal 2024

https://www.neomm.org